# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | सद्धर्म : त्रैमासिक |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१५ |
| वर्ष | : | पन्नासावे |
| अंक | : | दुसरा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१५**

**गणपत्रिका क्रमांक : १८४**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

सुवर्णमहोत्सव १५ ऑगस्ट १९६५ ते १४ ऑगस्ट २०१५
वर्ष : पन्नासावे, अंक : दुसरा आषाढ शके १९३७, जुलै २०१५

## *संपादकीय*

## योगदिवस

२१ जून २०१५ हा जागतिक 'योगदिवस' म्हणून साजरा झाला. एखाद्या विषयाला विशेष महत्त्व देण्याकरता अशा प्रकारचे दिवस साजरे करण्याची प्रथा गेली काही वर्षे रूढ झाली आहे. दुर्दैवाने असे महत्त्वाचे विषय, तो दिवस संपला की संपतात. वास्तविक असे विषय ही कायमस्वरूपी अमलात आणण्याची गोष्ट असते. योगाच्या बाबतीत म्हणाल तर, 'योग' हा नक्कीच कुतूहलापलीकडे जाऊन गांभीर्याने घेण्याचा विषय आहे. योगसाधना करणाऱ्या आणि योग शिकवणाऱ्या हजारो संस्था देशात आणि परदेशांत आज आहेत. ''योग'' दिवसामुळे यामध्ये काही फारसा फरक पडेल अशी शक्यता नाही. योगदिवसानिमित्ताने भारतातील काही विद्वान आणि राजकारण्यांनी व्यक्त केलेली मते मात्र दुःखकारकच नाहीत तर हास्यास्पदसुद्धा आहेत.

पतंजलींनी लिहिलेला 'योगसूत्र' (सुमारे इ.स. पूर्व १०० ते इ.स.३००) हा योगशास्त्राचा प्रमाण ग्रंथ. योगासंबंधीचे प्रचंड सैद्धान्तिक ज्ञान केवळ १९६ सूत्रांमध्ये यात ग्रंथित करण्यात आले आहे. गेल्या दोन हजार वर्षांत अनेक विद्वान आणि आचार्यांनी यावर काही शेकड्यांनी भाष्य आणि टीकाग्रंथही लिहिले आहेत. पतंजलींनी योगशास्त्र सूत्रबद्ध करण्याआधीही हा विषय कठोपनिषदासारख्या उपनिषदांमधून (सुमारे इ.स.पूर्व ५००-३०० ते इ.स.चे १ ले शतक) मांडण्यात आला होता. शिवाय या योगाचे तत्त्वज्ञान आणि प्रत्यक्ष व्यवहारही भारताची दर्शनशास्त्रे, आयुर्वेदापासून ते कलांच्या शास्त्रांमध्येही मुक्तपणे वापरण्यात आले आहे. दुर्दैवाने भारतातच हे योगशास्त्र आज प्राणायाम आणि आसनांच्या पलीकडे जाताना दिसत नाही. योगदिनाच्या दिवशी तर यावर अधिकच शिक्कामोर्तब करण्यात आले. दुर्दैवाने सत्य, अहिंसा, मानवता आणि समाजवादासारखा राजकारण्यांना चघळण्याचा हा एक 'योगवाद' बनू नये याची कटाक्षाने काळजी घेण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

१९ व्या, २० व्या शतकामध्ये भारतातल्या काही संत, महंत आणि स्वामींमुळे भारतीय संस्कृतीबद्दलचे

(पृष्ठ क्र. ३१ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : **सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,** द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) **सभासद देणगी** : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता)

परदेशस्थ सभासदांना १२५ $ दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता) .५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहिती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

५) **दि. १ एप्रिल २०१५ पासून मनीऑर्डरने पैसे पाठविता येणार नाहीत.**

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया SBI | जे के ग्राम, ठाणे (प.) | 10884930955 | SBIN 0009056 |
| ठाणे जनता सहकारी बँक TJSB | खोपट, ठाणे (प.) | 009110100016689 | TJSB 0000009 |
| ठाणे भारत सहकारी बँक लि. TBSB | मुख्य शाखा,ठाणे (प.) | 002115000024520 | TBSB 0000002 |

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

<u>देणगी खालील ठिकाणी ही स्वीकारली जाते.</u>

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी,** कापडाचे व्यापारी, १४८, प्रार्थना समाज, गिरगांव, मुंबई - ४०० ००४. दूरध्वनी : २३८८०६४५ (रविवारी बंद) येथे **<u>फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी धनादेश पाठवू नये.</u>**

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**श्री. प्रकाश भा. दीक्षित,** ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे४००६०१. दू.क्र : २५४७२००५, भ.क्र: ९८१९६९३१९५
अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ. (आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेला असतो.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


संपादकीय १

देणगीसंबंधी निवेदन २

संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार ४

श्रीमच्छंकराचार्यविरचितद्वादशज्योतिर्लिङ्ग स्तोत्रम् । सौराष्ट्रे सोमनाथं च। ५

कौटिलीय अर्थशास्त्र - ग्रंथारंभ ६

गीतकृष्णायन-भाग ४- युगपुरुष ७

वामनाची गोष्ट ११

ॐ नमोजी आद्या। १८

''अर्धनारीनटेश्वर देवाधिदेव महादेव स्वरूपवर्णन'' २३


**दीर्घकालीन सभासद (दी. का.)**

जेष्ठ नागरिक संघ कांदिवली, कांदिवली, मुंबई

विश्वनाथ सखाराम थत्ते, ठाणे

सुशीला वसंत मांजवकर, दहिसर, मुंबई

**– संपादक**

**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

१) सुलभ संध्या व पूजा रु. ५

२) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि रु. ५

३) हरितालिका पूजा विधि रु. १०

४) श्री सत्यनारायण पूजा व कथा रु. १५

५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) रु. १०

६) तुलसी विवाहविधि रु. १०

७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) रु.२५

८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक रु.१५
(या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.)

९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) रु.३०

१०) उपासना रु. ४०

११) श्रीरामरक्षेतील व्याकरण रु. ५०

१२) चांगदेव पासष्टी रु. ४०

१३) गंगालहरी रु. २५

१४) गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण रु. ३०

१५) सांख्यदर्शन रु. ५०

सद्धर्म प्रकाशनांत दूरूस्ती - १५. सांख्यदर्शन हे पुस्तक एप्रिल १३ पासून सवलतीच्या दराने ३०/- रुपयात देण्यांत येणार आहे. वाचक व देणगीदारांनी याचा फायदा घ्यावा.

१ एप्रिल २०१५ पासून टपाल खात्याने मनीऑर्डर सेवा बंद केल्याची घोषणा केलेली आहे. याचा परिणाम म्हणून या पुढे आपणास ट्रस्टकडे देणगी व इतर गोष्टीसाठी पैसे मनीऑर्डरने पाठविता येणे आता शक्य नाही. हे सर्व व्यवहार आता बँक व माहिती-तंत्रज्ञान सुविधांचा उपयोग करूनच करावे लागणार आहेत. महिती-तंत्रज्ञान क्षेत्रात आज मोठी प्रगती झाली आहे. या प्रगतीचा उपयोग करून ''सद्धर्म''च्या सर्व देणगीदार सभासदांशी नियमित संपर्क वाढवण्याचा हा प्रयत्न असून सुरुवात करण्यासाठी सर्व सभासदांस अशी नम्र विनंती आहे की त्यांनी आपले संपर्कासाठीचे दूरभाष, भ्रमणध्वनि क्रमांक व असल्यास इ-मेल पत्ता ''सद्धर्म'' कार्यालयास पाठवावेत. हे सर्व SMS वा फोन करून ९८१९६९३१९५ या भ्रमणध्वनि क्रमांकावर वा dikprak@gmail.com वर पाठवावेत. त्यात आपले संपूर्ण नाव व सभासद क्रमांक नमूद करावा म्हणजे योग्य ती नोंद घेणे सोपे व सोयीचे होईल. सर्व देणगीदार व हितचिंतकांनी लवकरात लवकर संपर्क साधून सहकार्य करावे ही विनंती आहे. **- संपादक / कार्यकारी विश्वस्त**

लेख २३ वा

**संस्कृतमधील न्याय**

**विधिरहो बलवानिति मे मतिः ।।**[३१०]

शेवटी नशीबच बलवत्तर असेच मला वाटते.
संपूर्ण सुभाषित -

**शशिदिवाकरयोर्ग्रह पीडनम्**
**गजभुजङ्गमयोरपि बन्धनम् ।**
**मतिमताञ्च विलोक्य दरिद्रताम्**
**विधिः अहो बलवान इति मे मतिः ।।**

चन्द्र व सूर्य यांना लागत असलेली ग्रहणे, हत्ती व साप यांनादेखील पडत असलेली बन्धने, विद्वान लोकांवर कोसळणारे दारिद्र्य हे सर्व पाहून मला वाटते की शेवटी हा नशिबाचाच खेळ आहे.

**विद्यते न खलु कश्चिदुपायः सर्वलोकपरितोषकरो यः ।।**[३११]

सर्वांचे समाधान होईल असा उपाय क्वचितच असतो.

संपूर्ण सुभाषित -

**सर्वथा स्वहितमाचरणीयं**
**किं करिष्यतो जनो बहुजल्पः ।**
**विद्यते न खलु कश्चिदुपायः**
**सर्व लोकपरितोषकरो यः ।।**

माणसाने स्वहिताचाच प्राधान्याने विचार करावा. लोक निरनिराळे विचार प्रकट करीत राहणारच. तिकडे लक्ष देऊ नये.

कोणी निंदा अथवा वंदा, आमचा स्वहिताचा धंदा.

**विक्रीयन्ते न घण्टाभिः गावः क्षीरविवर्जिताः ।।**[३१२]

सुंदर घंटा गळ्यात घातल्या म्हणून खाट्या गाई दुधारू समजून कोणी विकत घेतील काय?

पहिली ओळ : **गुणेषु क्रियतां यत्नः किमटोपैः प्रयोजनम् ।** एखाद्या वस्तूचे गुण चांगले असतील तर बाह्य अवडंबराची काही गरज राहत नाही.

**विषकुम्भं पयोमुरवम् ।।**[३१३]

प्रत्यक्षात विषाचा हंडा, पण काठावर दुधाचा फेस
संपूर्ण सुभाषित -

**परोक्षे कार्यहन्तारं**
**प्रत्यक्षे प्रियवादिनाम् ।**
**वर्जयेत तादृशं मित्रं**
**विषकुम्भं पयोमुखम् ।।**

आपल्या पाठीमागे आपल्या कार्याचा नाश करणारा, पण तोंडावर मात्र गोड बोलणारा असा मित्र टाळावा. मुँह में राम बगलमें छुरी । ह्याच अर्थाची म्हण यापूर्वी आपण पाहिली आहे. 'मधु तिष्ठति जिह्वाग्रे हृदये तु हालाहलम् ।' (क्रमांक ५६)

**यथाकांक्षा तथा सिद्धिः ।।**[३१४]

इच्छा तशी फळे

(पृष्ठ १७ वर)

**श्रीमच्छंकराचार्यविरचितद्वादशज्योतिर्लिङ्गस्तोत्रम् ।** दि. दा. औटी

**सौराष्ट्रे सोमनाथं च ।** लेख १ ला

**सौराष्ट्रदेशे विशदे ऽ तिरम्ये**
**ज्योतिर्मयं चन्द्रकलावतंसम् ।**
**भक्तिप्रदानाय कृपावतीर्णं**
**तं सोमनाथं शरणं प्रपद्ये ।।१।।**
**वृत्त-इन्द्रवज्रा**

**अन्वय :-** अतिरम्ये विशदे सौराष्ट्रदेशे, भक्तिप्रदानाय कृपावतीर्णं, ज्योतिर्मयं चन्द्रकलावतंसं तं सोमनाथ अहं शरणं प्रपद्ये ।

**भाषांतर :-** अतिशय रम्य, स्वच्छ अशा सौराष्ट्र देशात भक्ती प्रदान करण्यासाठी दयेने अवतीर्ण झालेल्या ज्योतिर्मय व ज्याच्या मस्तकावर चन्द्रकोर दागिन्याप्रमाणे आहे त्या सोमनाथाला (चन्द्रशेखराला) मी शरण आलो आहे.

शंकराचे सोमनाथ हे नाव कसे पडले ह्याविषयीची आख्यायिका :- ब्रह्मदेवाचा मुलगा दक्ष याने आपल्या सत्तावीस 'नक्षत्र' कन्या चन्द्राला दिल्या. पण चन्द्राचे खरे प्रेम 'रोहिणी' वरच होते व त्यामुळे तो इतर २६ नक्षत्रकन्यांकडे दुर्लक्ष करू लागला. ही तक्रार त्या कन्यांनी दक्षाकडे केली व दक्षाने चन्द्राला सर्व पत्न्यांवर सारखे प्रेम करायला सांगितले, परंतु चन्द्राने त्याकडे दुर्लक्ष केले. मग दक्षाने त्याला 'क्षयी' बनण्याचा शाप दिला. म्हणून चन्द्राने शंकराची आराधना केली व त्याला प्रसन्न करवून घेतले. शंकराने सांगितले, शाप अनिवार्य आहे. पण महिन्यातील पंधरा दिवस तुझा क्षय (कृष्ण पक्ष) होईल व महिन्यातील पंधरा दिवस वृद्धी (शुक्ल पक्ष) होईल. याप्रमाणे अमावास्येला पूर्ण क्षय व पौर्णिमेला पूर्ण वृद्धी होईल. अशा रितीने शंकर सोमाचे म्हणजे चन्द्राचे नाथ (रक्षक) बनले म्हणून शंकराला सोमनाथ - चन्द्राचा रक्षक म्हणतात.

दक्षाने चन्द्राला दिलेला शाप व शंकराने केलेले त्याचे रक्षण ह्या रूपकातून भारतीय कालगणनेची निर्मिती झाली म्हणजेच पञ्चाङ्ग निर्माण झाले.

राका म्हणजे पौर्णिमा व राकायाः ईशः राकेशः षष्ठी तत्पुरुष समास पौर्णिमेचा चन्द्र. हा राकेश जेव्हा चित्रा नक्षत्रात असतो तेव्हा चैत्री पौर्णिमा असते व त्यावरून त्या महिन्याला 'चैत्र' हे नाव दिले गेले. तसेच राकेश जेव्हा विशाखा नक्षत्रात असतो तेव्हा विशाखा. याप्रमाणेच ज्येष्ठा-ज्येष्ठ इत्यादी बाराही महिन्यांची नावे नाक्षत्रिकच आहेत. असे हे चान्द्रमहिने किती अर्थपूर्ण नावांनी ओळखले जातात हे आपल्या लक्षात येते. पण अशी व्युत्पत्ती जानेवारी इत्यादी इंग्रजी महिन्यांची दिसून येत नाही. भारतीय विचारसरणी किती तार्किक आहे हे सिद्ध होते.

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

कौटिलीय अर्थशास्त्र या ग्रंथाचा काळ, कर्ता, रचना, इतिहास, शैली इत्यादी विषयांविषयी जाणून घेतल्यावर आता प्रत्यक्ष ग्रंथातील विषयांचा विचार करू या.

कौटिलीय अर्थशास्त्र या ग्रंथाचा प्रारंभ 'ॐ नमः शुक्रबृहस्पतिभ्याम्' या नमनात्मक सूत्राने होतो. (सूत्र म्हणजे कमीत कमी शब्दांत अधिकाधिक आशय व्यक्त करणारे, व्याकरण आणि अर्थदृष्ट्या शुद्ध असे वाक्य. कौटिलीय अर्थशास्त्र हा ग्रंथ प्रामुख्याने अशा सूत्रमय शैलीत रचला आहे. मात्र एखाद्या विषयाचे सार सांगताना श्लोकांचा म्हणजे पद्यशैलीचा प्रयोग केलेला दिसतो.)

साधारणतः संस्कृत ग्रंथांचा प्रारंभ 'ॐ', 'अथ', 'श्री' अशा मंगलसूचक शब्दाने केला जातो. अशा मंगलशब्दाबरोबरच ग्रंथारंभी इष्ट देवतेला नमनही केले जाते. ग्रंथरचना करताना कोणतेही विघ्न येऊ नये अथवा ग्रंथ अपूर्ण राहू नये याकरता मंगलश्लोक रचण्याचा प्रघात आहे. या पद्धतीला अनुसरून कौटिलीय अर्थशास्त्राचा प्रारंभही ॐ या मंगलशब्दाने होतो. परंतु नमनात्मक सूत्रात देवतांना वंदन केलेले नसून 'शुक्र' आणि 'बृहस्पती' या अर्थशास्त्रप्रवीण असलेल्या दोन आचार्यांना वंदन केले आहे. हे दोघे आचार्य अर्थशास्त्राचे मूळ प्रवर्तक मानले जातात. यांपैकी शुक्र हे असुरांचे गुरू आणि पुरोहित तर बृहस्पती हे देवांचे गुरू आणि पुरोहित म्हणून प्रसिद्ध आहेत. पुरोहित म्हणजे अथर्ववेद आणि त्यांतील जारणमारण, जादूटोणा, मंत्रसिद्धी इ. गूढ विद्यांत पारंगत असलेला. कौटिल्याने अर्थशास्त्रात अशा विद्यांचा समावेश केला आहे. त्यामुळे देवासुरांचे नेतृत्व-पौरोहित्य करणाऱ्या या आचार्यांना ग्रंथारंभी नमन करणे उचितच आहे. ग्रंथाच्या सुरुवातीपासूनच त्याचे वेगळेपण आणि कौटिल्याचा विषय हाताळण्याचा वेगळा दृष्टिकोन दिसून येतो. कौटिल्याने ज्यांना वंदन केले आहे अशा शुक्र आणि बृहस्पतींविषयी थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे -

शुक्राचार्य - हिरण्यकश्यपूची कन्या दिव्या आणि भृगू यांचा हा पुत्र. याने असुरांचे पौरोहित्य स्वीकारले व अखेरपर्यंत तो असुरपक्षपातीच राहिला. शिवाची आराधना करून याने मृतसंजीवनी विद्या प्राप्त केली. या विद्येच्या बळावर त्याने असुरांना अनेक युद्धांत विजय प्राप्त करून दिला. याने 'बार्हस्पत्य' नावाचा हजार अध्यायांचा अर्थशास्त्रीय ग्रंथ रचला. ज्याचा अन्य आचार्यांनी नंतर संक्षेप केला. शुक्राचार्य 'कवी', 'उशना', 'काव्य' या नावांनीही ओळखले जातात.

बृहस्पती - देवांचे गुरू तसेच आचार्य म्हणून ऐतरेय ब्राह्मण, महाभारत इत्यादी ग्रंथांत बृहस्पतींचा निर्देश येतो. देवदैत्यांच्या संग्रामात दैत्यगुरूंना प्राप्त असलेल्या संजीवनी विद्येमुळे देवांचा पराजय झाला. तेव्हा आपल्या तेजोबलाने यांनी शुक्राचे रूप घेतले आणि असुरांचा बुद्धिभेद केला त्यामुळे देवांचा विजय झाला. आपला पुत्र

(पृष्ठ १० वर)

कंसवध झाल्यावर कंसाचे कंकादी आठ भाऊ श्रीकृष्णावर चालून गेले. तेव्हा बलरामानं रंगागारातील एक लोहस्तंभ उपटून त्यांचा सहजच वध केला. त्या दोघांचं शौर्य पाहून कंसपक्षीय स्तिमित, निस्तेज आणि निष्क्रिय होतात ते तसेच बसून राहिले. कंसाच्या भार्या भान सुटून कृष्णाला असंख्य दूषणं देऊ लागल्या. आपले पिता जरासंध यांजकरवी या कृत्याचा प्रतिशोध घेण्याबद्दल बडबडू लागल्या.

मात्र उपस्थित बहुसंख्यांनी रामकृष्णांचा जयजयकारच केला, त्यांना अक्षरशः डोक्यावर उचलून धरलं. इतकी वर्षं मूग गिळून सहन केलेल्या जुलुमाप्रतीची चीड, ओठांत दाबलेले शब्द, पापण्यांत गोठवलेले अश्रू या साऱ्यांना आज मोकळी वाट मिळाली. वसुदेव-देवकीला आनंदाची आसवं डोळ्यांत मावेना झाली.

तो हर्षशोकाचा आवेग ओसरताच कृष्ण सर्वांना घेऊन वसुदेवाच्या वाड्यावर आला. त्यानं उग्रसेनाला कारागृहातून मुक्त करून आपल्या भेटीला घेऊन येण्याची सैनिकांना आज्ञा केली. उग्रसेन सचिवांसह येताच कृष्ण म्हणाला, तात, कंसाचं दहन समंत्रक आणि राजाला शोभतील अशा विधींनी करावं तसंच आपण राजवस्त्रं पुनश्च धारण करून सिंहासनाधिष्ठित व्हावं अशी मी आपल्याला विनंती करतो.

यावर उग्रसेन म्हणाला, कृष्णा, माझा मुलगा असला तरी कंस पातकी होता. त्याला तू आपल्या पराक्रमानं नष्ट केलंयस. सिंहासनावर बसण्याचा अधिकार तुझा आहे.

नाही तात, मी तसं केलं तर जनहितासाठी केलेल्या माझ्या या कृत्याला राज्यलोभाचा कलंक लागेल. म्हणूनच हा राजमुकुट स्वेच्छेनं आपल्या शिरावर ठेवताना आज मला अतिशय समाधान वाटतंय.

त्यानंतर नंदाकडे वळून कृष्ण म्हणाला, तात, आपण आता लगोलग वृंदावनी परतावं. माता यशोदा आणि सारे वृंदावनवासी आपल्या कुशलाची वार्ता ऐकायला आतुर असतील. त्यांना इथल्या घडामोडी आपण सांगाव्यात. माझा निरोपही सांगावा की मला थोडा अवसर मिळताच मी स्वतः वृंदावनात येऊन सर्वांची भेट घेईन.

रामकृष्णांना वारंवार आलिंगनं देत नंद आणि इतर गोप भरल्या हृदयांनी वृंदावनी परतले.

कंसवधानंतर श्रीकृष्ण मथुरेत राजकारणात व्यग्र झाला. अर्थात शरीरानं तो मथुरेमध्ये असला तरी त्याचं मन मात्र वारंवार वृंदावनात धाव घेई. न राहवून त्यानं बलरामाला वृंदावनास भेट देऊन वृंदावनवासीयांचं कुशल विचारण्याची विनंती केली.

बलरामानं वृंदावनात जाण्याची लागलीच तयारी केली. निरोपसमयी वृंदावनवासीयांनी केलेला विलाप त्याच्या आठवणीत अजूनही ताजा होता. स्मशानकळा पसरलेलं वृंदावन पाहण्यासाठी आणि उद्ध्वस्त गोपकुळाला सामोरं जाण्यासाठी त्यानं आपलं मन घट्ट केलं. सचिंत

मनानंच अखेर तो वृंदावनात दाखल झाला.

आणि काय आश्चर्य! वृंदावनप्रवेशानंतर त्याला दिसून आलं की सर्व गोपकुळाचं दैनंदिन जीवन नेहमीसारखंच सुरळीतपणे चालू आहे. नंदापासून ते सर्वसामान्य गोपांपर्यंत ना कुणाच्या आचरणात वैषम्य आहे ना उच्चारात विषाद! ना कर्तव्यात कसूर आहे ना उत्साहात कसर! कृष्ण-बलराम वृंदावनात असताना जसे व्यवहार व्हायचे थेट तसेच सर्व जण वावरत आहेत. जणू ते दोघे वृंदावन सोडून कुठे गेलेच नाहीत!

नंद नेहमीच्याच धोरणीपणानं गोपांचं नेतृत्व करतो आहे, वृंदावनाचं लालनपालन करतो आहे. खुद्द यशोदा हसतमुखानं घरातली कामं करते आहे, आल्यागेल्याचं आदरातिथ्य करते आहे, गोधनाची काळजी वाहते आहे. आणि राधा?

ती वेडी तर एवढी कृष्णमय होऊन गेली आहे की स्वतःला पूर्ण विसरून, कृष्णरूपात तल्लीन होऊन 'राधे, राधे' म्हणून कृष्णाच्या प्रिय सखीचा सर्वत्र शोध घेते आहे!

अचंबित झालेल्या बलरामानं आपलं आश्चर्य अखेर गोपकुळातील एका जोडप्यापाशी बोलून दाखवलं. ती दोघंही तत्काळ त्याला उत्तर देती झाली...

**'गोपाल सोडुनी गेला' - जाती उद्धव**

गोपाल सोडुनी गेला ॥धृ॥
मारण्या दुष्ट कंसाला
निज कर्तव्या करण्याला
जाई तो जरि मथुरेला
ना गमे कधी आम्हांला ॥१॥

का वृथाच कष्टी होऊ
दैवास दूषणे देऊ
आपुल्या मना समजावू
ना कधी कुठे आम्हांला ॥ २॥

पाहसी यशोदामाते
हरिस्मरणाताच वावरते
पुसता स्मितवदने वदते
ना मुळी कधी आम्हांला ॥ ३॥

शोधे जी राधा ध्यानी
हरिभावाने वृंदवनी
'राधे राधे' रव करुनी
कैसे समजावे तिजला ॥ ४ ॥

साहू आम्ही विरहाला
पण ना साहेल तयाला
भक्तांचा देव भुकेला
मग फुकाच का हो बोला ॥ ५॥

वाटे जेव्हा भेटावे
तेव्हा हृदयात पहावे
दर्शन त्याने मग द्यावे
ऐसा हृदयस्थ कुणाला ॥ ६ ॥

ना पटे तरी दे साद
येई तत्क्षण प्रतिसाद
साधता असा संवाद
मग पटेल का रे तुजला ॥ ७ ॥

एका शुभमुहूर्तावर वसुदेवानं बलराम आणि श्रीकृष्णाचा उपनयनविधी पार पाडला. मग विद्वान ब्राह्मणांची पूजा करून वसुदेवानं त्यांना नम्रपणे विचारलं, या दोन तेजोगोलांकडून अध्ययन करवील असा कोणी तापस आपणांस माहीत आहे काय? त्यावर ते ब्राह्मण विचारपूर्वक आणि

निश्चयानं वदते झाले, यदुश्रेष्ठ, उज्जयिनीजवळ वास्तव्य करून असलेल्या सांदिपनी नामक सुशील आणि विद्वान आचार्यांखेरीज हे शिवधनुष्य उचलेल असा इतर कोणी आम्हांला तरी दिसत नाही.

त्यांचं निश्चित मत ऐकून प्रसन्न झालेला वसुदेव म्हणाला, ठीक आहे. तसंच होवो...

**'अध्ययन' - जाती पादाकुलक**

मथुरेमाजी होत उपनयन
मुनिजन वडिलां करुनी वंदन
अति पराक्रमी ते यदुनंदन
निघती करण्या शास्त्र अध्ययन ॥धृ॥

विशालकीर्ती गुरु सांदिपनी
सुखे नांदती रम्य उपवनी
यदुविर येता गृहि उज्जयिनी
संतोषाने डोले कानन ॥१॥

चौदा विद्या गुरू शिकविती
ज्ञानामृत ते स्वये वर्षती
पिण्या शिष्यही चकोर होती
प्रमाण त्यांना गुरुचे सुवचन ॥२॥

पुत्र लाडके वसुदेवाचे
सेवक तत्पर सांदिपनींचे
शिरी वाहती भारे धुनिचे
करिती गुरुचे पदसंवाहन ॥३॥

रामकृष्ण ते करता मोदे
गुरुबंधुंसह हास्यविनोदे
गुंजे आश्रम मधुर निनादे
गुरुचित्ताही वाटे रंजन ॥ ४ ॥

शास्त्रविनोदे काल लोटला
निरोप घेण्या प्रसंग आला
पूर येतसे कृतार्थतेला
अश्रूस्पर्शे भिजती लोचन ॥ ५ ॥

गुरुपत्नीचे शल्य ओळखुन
गुरुपुत्रासी देती आणुन
निरोप घेता पदी ओणवुन
गुरुहृदयाचे चुकले स्पंदन ॥ ६ ॥

अस्ति आणि प्राप्ति या कंसपत्नींनी कंसवधानंतर मगधदेशी जाऊन आपला पिता जरासंध याच्याजवळ कृष्णाचा सूड घेण्याचा हट्ट धरला होता. खुद्द जरासंधाच्या मनातही कृष्णाबद्दल द्वेष आणि त्याच्या अलौकिक शौर्याबद्दल असूया वसत होतीच. याची परिणती रामकृष्ण सांदिपनींकडे अध्ययन संपवून मथुरेत परत येताच जरासंधानं मथुरेवर रुक्मी आदी आपल्या मित्रांच्या साहाय्यानं केलेल्या भयानक हल्ल्यात झाली.

उग्रसेनाच्या नेतृत्वाखाली यादवसैन्यानं त्यांचा कडवा प्रतिकार केला. सतत अठ्ठावीस दिवस भगीरथ प्रयत्न करूनही जरासंधाचं काही चालेना. उलट त्याच्या पक्षातील उत्तमोत्तम वीर आणि डिंभकादी मल्ल यादवांकरवी यमसदनाला धाडले जाऊ लागले. शेवटी निराश होऊन जरासंध मगधात परतला.

पण त्यानंतर यादवांच्या विजयसभेत अभयदान घेऊन एक वृद्ध मंत्री म्हणाला, जरासंध डिवचलेल्या सर्पाप्रमाणं उलटणार हे निर्विवाद. या वेळेला आपण विजयी झालो असलो तरी पुढच्या खेपेस तो अधिक सतर्क असेल. त्या

वेळी विजय कोणत्याही पक्षाचा झाला तरी मथुरेची हानी काही टळणार नाही. हे सारं त्याच्या वैयक्तिक सूडभावनेतून निर्माण झालेलं असल्यानं रामकृष्ण मथुरेत नसले तर तो मथुरेकडे वाकडा डोळा करून बघेलसं वाटत नाही.

कृष्णानं संमतिदर्शक मान हलवून म्हटलं, आपलं म्हणणं रास्त आहे. मी आणि बलराम त्वरित मथुरा सोडून दक्षिणेस प्रयाण करतो.

यावर कृष्णाच्या चाहत्यांनी एकच गदारोळ केला. त्यांना शांत करत कृष्ण म्हणाला, आम्ही मथुरेचा त्याग कायमचा करत नाही. हे वादळ थोडं शमल्यावर आम्ही परत येऊच येऊ.

मग बलराम आणि कृष्ण आपापली आयुधं घेऊन दक्षिणापथाला लागलेले आहेत. दोघांच्याही खांद्यांवर धनुष्यं विलसत आहेत, पाठीला भाते लावलेले आहेत. खेरीज बलरामानं नांगर आणि कृष्णानं सुदर्शनचक्र धारण केलंय. बलराम काळ्या रंगाची वस्त्रं ल्यायलाय तर कृष्णानं पीतांबर परिधान केलाय. निर्भय आणि सशक्त असे ते यदुवीर नगरांमागून नगरं आणि गावांमागून गावं ओलांडत दक्षिणेला चाललेयत. वाटेत भेटणाऱ्या लोकांचं कुतूहल ते पुरवतायत. मार्गक्रमण करत आता ते वेणा नदीच्या तीरावर आलेयत.

तिथं तपश्चर्या करून कालक्रमणा करत असलेले द्विजशिरोमणी भगवान श्रीपरशुराम त्यांना भेटतात. अतिशय आदरानं परशुरामांना वंदन करून बलराम आणि कृष्ण आपली ओळख करून देतात आणि आपल्या दक्षिणाभियानाचा हेतू सांगतात. संभाषणाच्या ओघात ते परशुरामांना विचारतात की भगवन्, काही काल वास्तव्य करण्यायोग्य एखादं स्थळ आपण आम्हांला सुचवू शकाल का?

परशुरामही मोठया संतोषानं त्यांना उत्तर देतात...


**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४


●●●

(पृष्ठ क्र. ६ वरून...**कौटिलीय अर्थशास्त्र - ग्रंथारंभ**)

कच याला शुक्रांकडे पाठवून त्यांनी संजीवनी विद्या प्राप्त केली व दैत्यांना पराजित केले. ब्रह्मदेवांनी रचलेल्या 'बाहुदन्तक' नामक ग्रंथाचा बृहस्पतींनी तीन हजार अध्यायांत संक्षेप केला. धर्मशास्त्र, अर्थशास्त्रविषयक ग्रंथांची रचना यांनी केली असावी. हे ग्रंथ आज उपलब्ध नाहीत; परंतु 'महाभारत', 'कामन्दकीय नीतिसार', 'कौटिलीय अर्थशास्त्र' या ग्रंथांत त्यांची मते व उद्धरणे प्राप्त होतात.


**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २, रघुनाथ नगर,
तीन हात नाका,
ठाणे - ४०० ६०४


●●●

**कर्तव्यकर्म करीत राहा**

नर्मदेच्या उगमस्थानाजवळील वनश्रीचे रम्य दृश्य पाहून काश्यपाचे मन प्रसन्न झाले.

पाण्याच्या कुंडापासून थोड्याच अंतरावर एक चांगलीशी गुहा पाहून तेथे तपश्चर्येसाठी बसण्याचे त्याने निश्चित केले.

मोठ्या पहाटेस उठून काश्यप रानातून कंदमुळे गोळा करून आणी, कुंडावर जाऊन संध्यावंदन करी आणि गुहेत परत येऊन सारा दिवस ध्यानस्थ बसे.

अशा प्रकारे दिवसांमागून दिवस गेले. पूर्वी विचलित झालेले त्याचे मन आता तपश्चर्येमुळे पुष्कळ स्थिर झाले आणि त्याला उल्हास वाटू लागला.

एके दिवशी तपश्चर्या आटोपून काश्यप संध्यावंदनासाठी नेहमीप्रमाणे कुंडाकडे जात होता. मध्ये एक कडा आल्याने त्याला कुंड दिसत नव्हते. पण तेथे कोणीतरी मोठ्याने गात असल्याचा आवाज त्याला ऐकू आला.

'इथे निर्जन अरण्यात आज कोण बरं आलं असेल?' असे स्वतःशीच आश्चर्याने म्हणत तो पुढे गेला.

पाहतो तो कुंडावर एक तेजस्वी ऋषी कृष्णाजिनावर पद्मासन घालून बसलेला आहे!

लांब पांढऱ्याशुभ्र जटा त्याच्या विशाल पाठीवर रुळत होत्या. त्याचे कपाळ भव्य असून कांती सतेज होती. त्याने वल्कले धारण केली असून बाजूला भूमीवर कमंडलू ठेवला होता.

ऋषीचे डोळे अर्धोन्मीलित होते. हात जोडलेले असून मुखातून गंभीर आवाजात म्हटलेले एक सूक्त अस्खलितपणे बाहेर पडत होते. सूक्त प्रसादिक होते.

ऋषीला पाहून काश्यप थबकला. हा कोण आहे हे जाणण्याची साहजिकच त्याला उत्सुकता वाटली. पण त्याच्या साधनेत व्यत्यय येऊ नये म्हणून काश्यप बाजूला एका झाडाखाली स्तब्ध उभा राहिला.

सूक्त संपताच ऋषीने डोळे उघडले, आचमन करून डोळ्यांना पाणी लाविले आणि स्वस्थ चित्ताने समोर पाहिले.

तेव्हा काश्यपाने त्याच्याजवळ जाऊन त्याला वंदन केले.

सूक्ताच्या शेवटी ऋषीने आपल्या गोत्राचा उल्लेख केला होता. त्यावरून हा कुलगुरू अगस्तिऋषीच आहे हे काश्यपाने ओळखले होते.

अगस्ती वयाने अत्यंत वृद्ध असला तरी त्याचे मुख बालरवीप्रमाणे तेजःपुंज होते. त्याच्या दृष्टीत वात्सल्यभाव पूर्णपणे ओसंडत होता.

त्याच्याकडे पाहत असता, विंध्य ओलांडण्याचे साहस करणारा प्राचीन अगस्तीच जणू आपल्यासमोर प्रकट झाला आहे असा काश्यपाला भास झाला.

आपले नाव वगैरे सांगून काश्यप त्याला अत्यंत नम्रतेने म्हणाला, ''महाराज, आपलं दर्शन झालं हे माझ्या तपश्चर्येचंच फळ आहे असं मी समजतो. आपण मला गुरुस्थानी आहांत.''

मरीची प्रजापतीचा पुत्र जो कश्यपऋषी त्याचा हा वंशज भेटल्याने अगस्तीला आनंद झाला. काश्यपाची नम्रता पाहून त्याला संतोष वाटला आणि त्याला आपल्याजवळ बसवून अगस्तीने त्याचे कुशलादी विचारले.

काश्यप आपली हकिकत सांगू लागला.

ती सांगत असता बलिराजाच्या भोगप्रधान राजवटीचे संपूर्ण चित्र डोळ्यांपुढे उभे राहून तपचश्चर्येने लाभलेली त्याच्या चित्ताची शांती ढळली आणि अस्वस्थ मनाने तो अगस्तीला म्हणाला, ''महाराज, आपण ज्ञानी आहांत, आपणांस मी काय सांगणार? पण बलिराजाने प्रजेला विषयासक्त बनविल्यामुळे वेदाध्ययन बंद झालं आहे... महाराज, ऋषींचे आश्रम आता ओस पडले आहेत...''

हे म्हणत असता साऱ्या जुन्या स्मृती जागृत होऊन काश्यपाच्या भावना उचंबळून आल्या. त्याचे मुख म्लान झाले. तोंडून शब्द उमटेना.

त्याची ही अवस्था पाहून अगस्ती त्याला शांत करू लागला.

पण शांत होण्याऐवजी काश्यपाच्या भावनांचा एकदम स्फोटच झाला. आवाज कंपित झाल्याने तो अडखळत अडखळत म्हणाला, ''महाराज, आश्रम ओस पडल्याचं दुःख नाही हो...''

आता पुन्हा त्याच्याने बोलवेना. क्षणभर तो थांबला. शून्य दृष्टीने समोर पाहत त्याने एक दीर्घ सुसकारा टाकला.

मग हळूहळू तो बोलू लागला, ''महाराज, लोक विषयांच्या मागे इतके लागले आहेत की ते मिळविण्यासाठी वाटेल ते करण्याची त्यांची तयारी आहे. ह्या विषयासक्तीपायी त्यांची मनं दुर्बल झाली आहेत. विचार उरला नाही. त्यामुळे यज्ञ करून हवा तो विषय मिळवता येतो ह्या गोष्टीवर आता सर्वांचा अंधविश्वास बसला आहे. महाराज, आज पाहावं तिथे लोकांना भोग्य विषय मिळवून देण्यासाठी आपले ऋषी नाना प्रकारचे काम्य यज्ञ करण्यातच गुंतलेले दिसत आहेत.''

हे म्हणत असता काश्यपाच्या भावना पुन्हा उचंबळू लागल्या. अगस्तिऋषी त्याचे म्हणणे सहानुभूतिपूर्वक ऐकून घेत होता.

काश्यप आता थोड्याशा त्वेषानेच बोलत होता, ''महाराज, ज्या वेदांनी त्याग करा, त्याग करा, द्या, एकट्यानंच खाऊ नका असा संदेश आक्रोशून दिलेला आहे त्याच वेदांतील मंत्रांचा विनियोग भोग्य विषयांच्या प्राप्तीसाठी स्वार्थबुद्धीनं केलेल्या यज्ञांत आहुती टाकताना व्हावा ह्याहून अधिक लाजिरवाणी गोष्ट ती कोणती? महाराज, ह्या काम्य यज्ञांपायी लोकांची भोगासक्ती वाढतच चालली आहे.''

काश्यप करीत असलेली वस्तुस्थितीची ही मीमांसा ऐकून अगस्तीला त्याचे कौतुक वाटत होते. तो काश्यपाचे म्हणणे शांतपणे ऐकत होता.

थोडा दम खाऊन काश्यप म्हणाला, 'आणि बलिराजाला तर नेमकं हेच हवं आहे.

कारण त्याला पक्कं ठाऊक आहे, की प्रजेची भोगासक्ती जितकी वाढेल तितकी ती प्रजा मनानं दुबळीही अधिक होईल. महाराज, प्रजेचं दौर्बल्य हेच राजाचं बल.''

काश्यपाच्या ह्या विवरणाने अगस्तीला संतोष झाला. काश्यपाचे कौतुक करीत तो म्हणाला, ''होय काश्यपा, म्हणूनच ऋषींना आपल्या पुढ्यात घेऊन बलिराजा ह्या काम्य यज्ञांना प्रोत्साहन देत आहे.''

काश्यपाचा उद्वेग आता वाढला होता. तो म्हणाला, ''होय महाराज, त्याग शिकवणाऱ्या वेदांच्याच साहाय्यानं भोगवृत्तीला दिलेलं हे प्रोत्साहन पाहून मन उद्विग्न होतं. महाराज, वेदांची ही विटंबनाच नव्हे काय?... पण काय करणार? बलिराजा अत्यंत बलिष्ठ आहे. ऋषी त्याच्या कच्छपी आहेत. मी मी म्हणणारेसुद्धा त्याच्यासमोर उभे राहू शकत नाहीत. मग माझी काय कथा?''

काश्यपाचा आवाज आता अगदी मंद झाला. त्याच्या मुद्रेवर नैराश्याची भावना व्यक्त झाली होती. तो पुढे म्हणाला, ''महाराज, आपण लहान आहोत, एकटे आहोत, आपल्या हातून काय होणार, कितीसं होणार ह्या विचारानं मन निराश होतं. भोगवृत्तीपायी लोकांचं मनोदौर्बल्य असंच वाढत गेलं तर अखेर त्याचा परिणाम काय होईल हा विचार मनात आला की समोर अंधारच अंधार दिसू लागतो...''

हे म्हणत असता काश्यपाच्या भावनांचा पुन्हा उद्रेक होऊन त्याला खरोखरीच समोर अंधार दिसू लागला. म्हणून त्याने डोळे मिटून आपले डोके दोन्ही हातांनी गच्च आवळून धरले.

ते पाहून अगस्तीने काश्यपाच्या पाठीवरून वात्सल्याने हात फिरवीत त्याला धीर देऊन म्हटले, ''वत्सा, निराश होऊ नकोस; धीर धर, धीर धर. सांग, तुझी परमेश्वरावर निष्ठा आहे ना?''

अगस्तीचा हा प्रश्न ऐकताच, कोणीतरी गदगदा हालवून, अंतर्यामी असलेल्या परमेश्वराची आपल्याला जाणीव करून देत आहे असा काश्यपाला भास झाला. त्याच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले. डोळ्यांत निष्ठा प्रकट झाली.

ते पाहून अगस्ती पुढे बोलू लागला. त्याच्या वाणीतून आता प्रभुत्व ओसंडत होते. नजर दयार्द्र होती. तो म्हणाला, ''काश्यपा, आपण लहान आहोत असं तू का समजतोस? अरे, इवल्याशा बीजातूनच प्रचंड वृक्ष निर्माण होतो आणि एका ठिणगीतूनच वडवानळ पेट घेतो ना? काश्यपा, समोरच असलेला हा नर्मदेचा उगम पाहा. एका करांगुलीएवढ्या धारेचंच तुझ्या आश्रमाशेजारी केवढं अफाट पात्र झालं आहे ते लक्षात आण; निराश होऊ नकोस.''

काश्यप आपले भाषण एकाग्रतेने ऐकत आहे असे पाहून अगस्ती पुढे म्हणाला, ''काश्यपा, आपण एकटे आहोत, असं समजू नकोस. खातरी असू दे, की ज्यानं प्रळयकाळी मत्स्याचं रूप घेऊन मनूला वाचवलं, समुद्रमंथनाच्या प्रसंगी कूर्माचं रूप घेऊन मंदराला सावरून धरलं, दैत्यांनी पृथ्वीला रसातळाला नेलं असता वराहाचं रूप घेऊन ज्यानं तिला वर काढलं आणि मंदबुद्धीनं पछाडलेल्या हिरण्यकश्यपू दैत्याला ज्यानं विलक्षण अशा नरसिंहाचं रूप घेऊन ठार मारलं आणि त्याच्या जागी सर्व प्राणिमात्रांबद्दल एकात्मतेची भावना बाळगणाऱ्या त्याच्या पुत्राला

त्याच्या सिंहासनावर बसवलं. तो सर्वव्यापी भगवान श्रीविष्णू आजही आपल्या पाठीशी उभा आहे. काश्यपा, त्याच्यावर निष्ठा ठेव आणि आपलं कर्तव्यकर्म निर्भयपणे करीत राहा.''

असे म्हणत अगस्ती उठला आणि त्याने कृष्णाजिन व कमंडलू हातात घेत काश्यपाला म्हटले, ''काश्यपा, पुढल्या मुक्कामाला मला वेळेवर पोचलं पाहिजे. येतो मी. तुझं कल्याण असो.''

काश्यपाने त्याच्या पायांवर आदराने मस्तक ठेविले.

अगस्तीने त्याच्या मस्तकावर हात ठेवून त्याला आशीर्वाद दिला आणि आपला मार्ग धरला.

काश्यप काही वेळ तेथे कुंडावरच बसून अगस्तीच्या भाषणाचा विचार करीत राहिला.

त्याच्या हृदयात आज एक नवीनच संवेदना निर्माण झाली होती.

त्यामुळे त्याला आता अधिक तपश्चर्येची गरज उरली नव्हती.

दुसऱ्या दिवशी पहाटेस तो स्थिरचित्ताने आणि निश्चयी मनाने आपल्या आश्रमास जाण्यासाठी तेथून झपाझप पावले टाकीत निघाला.

### आठवं वर्ष लागलंसुद्धा

अमरकंटक पर्वतावरून काश्यप जो निघाला तो थोड्याच दिवसांनी आपल्या आश्रमात येऊन पोचला.

पृश्नी चातकाप्रमाणे त्याची मार्गप्रतीक्षा करीत होती. लक्ष जरी गृहकृत्यांत असले तरी तिचे डोळे नेहमी आश्रमाच्या दरवाजाकडे असत.

काश्यप दृष्टीस पडताच पृश्नीला आनंद झाला. त्याची धीरगंभीर मुद्रा पाहून तिला समाधान वाटले.

त्याच्या येण्याने आश्रमात पुन्हा चैतन्य निर्माण झाले.

पृश्नीचा उल्हास पाहून काश्यपालाही आनंद झाला. आपल्या पश्चात पत्नीने अग्नीची जोपासना करण्यात मुळीही खंड पडू दिला नाही आणि गृहस्थधर्माचेही उत्तम प्रकारे पालन केले हे समजल्यावर त्याला संतोष झाला. त्याबद्दल त्याने पृश्नीची प्रशंसा केली. तिने केलेल्या पयोव्रताची हकिकत ऐकून तर काश्यपाला कृतकृत्यता वाटली. पृश्नीबद्दलचा त्याचा आदर द्विगुणित झाला.

आश्रमी जीवन संथपणे सुरू झाले.

अगस्तीच्या उपदेशामुळे काश्यपाचे नैराश्य नाहीसे होऊन त्याचे चित्त स्थिर झाले होते. तो कर्तव्यपरायण बनला होता. आश्रमधर्म काटेकोरपणे पाळून आपला सारा वेळ तो अध्ययन आणि मनन करण्यात घालवू लागला.

पृश्नीचाही वेळ आता आनंदात जाऊ लागला. सकाळच्या वेळी भगवंताच्या मूर्तीची ती मनोभावाने पूजा करी. गृहकृत्य आटोपल्यावर बरीच रात्र होईपर्यंत त्या मूर्तीसमोर बसून घटका न् घटका ती भगवंताचे ध्यान करी.

दिवसभर ती गृहकृत्यांत गुंतलेली असे. पण हातांनी काम चालू असले तरी तिचे चित्त मात्र सदा भगवंताकडे लागलेले असे. तोंडाने प्रायः 'ॐ नमो भगवते वासुदेवाय।' ह्या मंत्राचा ती जप करी.

ते पाहून इतर ऋषिस्त्रिया कौतुकाने म्हणत की पृश्नी विष्णुवेडी बनली आहे.

आणि तिने विष्णुवेडी का होऊ नये? पयोव्रताच्या उद्यापनाच्या रात्री भगवंताचे दर्शन झाल्यापासून तिच्या चित्ताला जी प्रसन्नता लाभली होती त्याचे मोल काही आगळेच होते. त्यासाठी कोणीही विष्णूचे वेड लावून घेईल.

आणि विष्णूच्या त्या वेडाचे फळही तिला लवकरच मिळाले. तिला विष्णूचा प्रसाद झाला.

आधीच पृश्नीची मुद्रा किती तेजस्वी! आता तिचे तेज दिवसेंदिवस वाढू लागले.

लवकरच ते ऋषिस्त्रियांच्या लक्षात आले.

मग आजूबाजूच्या सर्व आश्रमांतून ती आनंदाची बातमी पसरण्यास किती काळ लागणार?

साऱ्या ऋषिस्त्रिया तिचे शुभ चिंतू लागल्या. गोरगरिबांचे आशीर्वाद मिळू लागले. पृश्नीला दीप्तिमान पुत्र होवो असे प्रत्येक जण इच्छू लागला.

पृश्नी सर्वांनाच प्रिय होती. मग साऱ्यांनी तिचे प्रिय इच्छावे ह्यात नवल ते कसले?

''पृश्नी, साऱ्या ब्रह्मांडाचं तेज तुझ्या ठिकाणी एकवटल्यासारखं दिसत आहे. पाहा तर!'' असे तिच्या वाढत्या तेजाकडे पाहून ऋषिस्त्रिया तिला म्हणू लागल्या.

ते ऐकून पृश्नीला गहिवरून येई. ती त्यांना म्हणे, ''बायांनो, मायेमुळे तुम्हांला तसं वाटतं, नाहीतर मी काय जगाहून वेगळी का आहे?''

पण पृश्नी जरी जगावेगळी नव्हती तरी अवघ्या जगाला व्यापून टाकणारा भगवान विष्णू तिच्या पोटी जन्माला येणार होता हे निश्चित.

योग्य वेळी पृश्नीला पुत्ररत्न झाले.

त्याच्या जन्मसमयी सर्व प्रकारची शुभचिन्हे प्रकट झाली. नर्मदा दुथडी भरून वाहू लागली; विहिरीतलावांचे पाणी निर्मळ झाले; त्यांत कमळे फुलली; झाडांना मोहोर आला; केवड्यांच्या वासाने रान दरवळले, आश्रमातील फुलझाडे बहरली. हरिणी पर्णकुटीभोवती घोटाळू लागल्या. गायींना पान्हा फुटला आणि बालकाच्या शुभागमनाची वार्ता देण्यासाठी मैनांनी मंजूळ गायन सुरू केले.

सर्वत्र मांगल्य पसरले.

पृश्नीच्या त्या बाळाला पाहून हा कोणीतरी अद्वितीय पुरुषच येथे जन्माला आला आहे असे सारे जण म्हणत.

वर्णाने तो श्याम होता. त्याच्या डोळ्यांत दया आणि मुखावर स्मित होते. मुद्रा अत्यंत प्रसन्न होती.

आपल्या चिमुकल्या हाताच्या मुठी वळून दोन्ही पाय हवेत नाचवीत तो हसून आकाशाकडे पाहत खेळू लागला म्हणजे हा बाळ जणू ब्रह्मांडालाच गवसणी घालण्यासाठी धडपड करीत आहे असे वाटे.

त्याला पाहून सर्वांना आनंद होई.

चंद्रकलेप्रमाणे वाढणाऱ्या त्या बाळाची कुशाग्र बुद्धी आणि तीव्र ग्रहणशक्ती पाहून सर्वांना आश्चर्य वाटे.

मूर्ती ठेंगणी म्हणून कौतुकाने त्याचे नाव वामन असे पडले.

काही वर्षे लोटली.

एके दिवशी दोन प्रहरी आपले आन्हिक वगैरे आटोपून काश्यप पर्णकुटीच्या दारातील अशोकाच्या पारावर नेहमीप्रमाणे बसला होता.

दूर थोड्या अंतरावर वामन हातातील कोवळ्या दूर्वा हरणाच्या एका पाडसाला चारत होता. हरिणी कृतज्ञतेने वामनाचा पाय चाटीत होती.

काश्यप ते मोहक दृश्य पाहण्यात गर्क झाला.

थोड्या वेळाने पृश्नी आपले गृहकृत्य आटोपून तेथे आली.

तिचे लक्ष वामनाकडे जाताच तिची मुद्रा एकाएकी म्लान होऊन डोळ्यांत आसवे उभी राहिली.

ते पाहून काश्यपाला आश्चर्य वाटले. तो पृश्नीला म्हणाला, ''भार्ये, समोरील दृश्य इतकं मनोहर असता तू अशी खिन्न का झालीस?''

मोठ्या संयमाने हुंदके दाबीत पृश्नी म्हणाली,

''महाराज, बलिराजाच्या ह्या राजवटीत आता वेदाध्ययनात काही अर्थ राहिला नाही म्हणून ऋषींची मुलं शिक्षणासाठी भराभर नगरात जात आहेत. तेथील भोगवृत्ती बळावणारं शिक्षण घेऊन देहपूजक बनत आहेत...''

पृश्नीने आवंढा गिळला आणि ती अत्यंत कष्टाने पुढे म्हणाली, ''महाराज, आपला बाळही जर नगरात जाऊन तसाच बनला तर हजारो वर्षांपासून जतन केलेल्या काश्यपांच्या अग्नीचं काय होणार, ह्या विचारानं मला वाईट वाटलं.''

इतका वेळपर्यंत दाबलेला हुंदका आता एकदम बाहेर पडला आणि त्या भरातच तिने काश्यपाला प्रश्न केला, ''होईल का हो तसं?''

पृश्नीच्या ह्या आकस्मिक प्रश्नाने काश्यपाच्या जणू मर्मावरच घाव घातला. पण आपली शांती ढळू न देता त्याने पृश्नीला उलट प्रश्न केला, ''पृश्नी, तुझी वेदांवर निष्ठा आहे ना?''

पतीचा हा प्रश्न कानी पडताच पृश्नीला एकदम हादरल्यासारखे होऊन तिचे सुप्त मन खडबडून जागे झाले आणि ती काश्यपाला निश्चयात्मक वाणीने म्हणाली, ''प्रभो, वेदांवर माझी नुसती निष्ठा आहे एवढंच नव्हे, तर बलिराजाने माजविलेल्या देहपूजेला आळा घालण्याचं सामर्थ्य एका वेदांच्याच ठिकाणी आहे असा मला पूर्ण भरंवसा आहे.''

पत्नीचे हे भाषण ऐकू न काश्यपाला समाधान वाटले. तो तिला म्हणाला, ''मग बाळाकडून आपण वेदांचंच अध्ययन करवायचं ना?''

पृश्नीचा आत्मविश्वास आता जागृत झालेला होता. त्याच्या जोरावर ती पतीला म्हणाली,

''प्रभो, मी ऋषिकन्या आहे. पित्याच्या घरी असताना मीही वेदांचं अध्ययन केलेलं आहे. त्याचे संस्कार मी कसे विसरेन? महाराज, बाळावरही तेच संस्कार झाले पाहिजेत.''

पृश्नीचे हे शब्द ऐकून काश्यपाला धन्यता वाटली. उल्हसित मुद्रेने तो तिला म्हणाला,

''पृथ्वी, तर मग बाळाला आठवं वर्ष लागल्यावर आपण त्याची मुंज करून त्याच्या वेदाध्ययनाला सुरुवात करू.''

आता पृश्नीच्या मुखावर प्रसन्नता दिसू लागली. ती म्हणाली, ''प्रभो, ह्या भाद्रपदात त्याला आठवं वर्ष लागलंसुद्धां.''

काश्यप म्हणाला, ''होय, खरंच. तर मग भार्ये, आता प्रतिपदा येईल. तेव्हापासून मी गायत्रीमंत्राच्या पुरश्चरणाला प्रारंभ करतो. ते झाल्यावर लगेच आपण बाळाची मुंज करू''

काश्यपाचे भाषण पुरे होत आहे तोच वामन धावत धावत तेथे आला. पित्याचे शेवटचे शब्द त्याच्या कानी पडले. ते ऐकून त्याची मुद्रा हर्षनिर्भर झाली.

आनंदाने उडी मारीतच तो पित्याला म्हणाला, ''तात, माझी मुंज ! कधी करायची माझी मुंज?''

त्याच्या तोंडावरून ममतेने हात फिरवीत काश्यप म्हणाला, ''बाळ, लवकरच करू हं तुझी मुंज.''

हे म्हणत असता काश्यपाची नजर पृश्नीकडे होती. तीही पतीकडे अर्थपूर्ण दृष्टीने पाहत होती.

आणि वामन मुंज होणार म्हणून आपल्याच खुशीत होता.

**कै. गुंडोपंत हरिभक्त**

•••

(पृष्ठ क्र. ४ वरून..**संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार ...**)

संपूर्ण सुभाषित -

**कार्या च महदाकाङ्क्षा क्षुद्राकाङ्क्षा कदापि न।**
**यथाकाङ्क्षा तथा सिद्धिः, निरीहो नाश्नुते महत्॥**

माणसाने नेहमी महत्त्वाकांक्षी असावे. सामान्य आकाङ्क्षा बाळगू नये कारण ज्याप्रमाणे इच्छा त्याप्रमाणे फळे, निरपेक्ष असू नये.

**संस्कृतमधील न्याय व तदनुषंगिक म्हणी....**

''न्याय'' म्हणजे दाखला किंवा दृष्टान्त. मराठीमध्ये म्हणींनी किंवा सांप्रदायिक वाक्यांनी जे काम होते तेच संस्कृतात न्यायांनी होते.

**अंधपङ्गु न्याय** ३१५ - 'आंधळा व पांगळा' - आंधळ्याने पांगळ्यास खांद्यावर घेतले व पांगळ्याने त्याला रस्ता सांगितला. अशा रितीने दोघेही बिकट वाटेतून सुखरूप बाहेर पडले.

'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ'

**अर्धकुक्कुटीन्याय** ३१६ - 'अर्धी अर्धी कोंबडी.' कोंबडीचा पुढचा अर्धा भाग शिजण्यासाठी आणि मागचा अर्धा भाग अंडी घालण्यासाठी वापरू पाहणे. एखाद्या गोष्टीपासून वाजवीपेक्षा अधिक फायदा घेण्याचा निष्फळ प्रयत्न.

**कफोणीगुडन्याय** ३१७ - 'कोपरावरचा गूळ'. कोपराला चिकटलेला गूळ चाटता येईल असे वाटते, पण तोंड कोपरापर्यंत पोचत नाही. एखादी गोष्ट सहज करता येईल असे वाटते, पण प्रत्यक्ष करू गेल्यास अशक्य होते तेव्हा हा न्याय सांगतात.

क्रमशः

**दि. दा. औटी**

•••

वेदान्त तत्त्वज्ञान हे ज्या काही मूलभूत सिद्धान्तावर आधारित आहे किंवा रचले गेले आहे त्यांतील पहिला मूलभूत सिद्धान्त असा आहे की हे सर्व ब्रह्मांड व त्यातील चराचर हे एका ब्रह्मतत्त्व या आदिशक्तीपासून निर्माण झाले आहे. हे तत्त्व सर्वांचे 'आदी' आहे, पण त्याला कोणीही आदी नाही, ते स्वयंभू आहे. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानी त्याचे 'Causeless Cause' असे वर्णन करतात.

या विश्वप्रकृतीमधील निरनिराळ्या पदार्थांचे व अद्‌भुत घटनांचे वैज्ञानिक दृष्टीने मूळ कारण शोधण्याचा व त्यांच्या निर्मितीचा कारणभाव जाणण्याचा प्रयत्न मानव करू लागला व त्याद्वारेच 'पदार्थविज्ञान, रसायन' आदी शास्त्रे प्रगत होत गेली. या विश्वातील अनंत पदार्थ व वस्तू या काही मर्यादित मूलतत्त्वांच्या अणूंपासून (मिश्रण किंवा जोडणींतून) बनलेल्या आहेत असा शोध शास्त्रज्ञांनी लावला (Dalton's Atomic theory). त्यापुढे जाऊन या भिन्न मूलतत्त्वांचे अणू निरनिराळ्या गुणधर्मांचे असले तरी ते सर्व Proton, Neutron व Electron या मूलभूत वस्तुकणांतूनच बनले आहेत असेही शास्त्रज्ञांनी शोधून काढले. विश्वातील अनंत पदार्थ वा वस्तू या तीन सूक्ष्म वस्तुकणांपासूनच बनल्या आहेत हे समजल्यावर हे तीन मूलभूत कण कशापासून बनले आहेत, त्यांची निर्मिती कशी झाली असावी याचा शोध सुरू झाला. हे अणू प्रकाशलहरींच्या लांबीपेक्षाही खूप पटींनी सूक्ष्म असल्यामुळे ते सूक्ष्मदर्शक (Microscope) यंत्राने दिसणे अशक्य होते. (सूक्ष्म जिवाणू - Bacteria - हे प्रकाशलहरींपेक्षा खूप मोठे असल्यामुळे आपण सूक्ष्मदर्शक यंत्राने पाहू शकतो.)

विज्ञान व तंत्रज्ञानाची आणखी प्रगती झाल्यावर, प्रकाशाऐवजी विजाणूंचा प्रवाह वापरून सिद्ध केलेल्या Electron-Camera ने अणू आणि परमाणूंचे फोटो घेणे शास्त्रज्ञांना शक्य झाले. त्या छायाचित्रांतून असे आढळून आले की, कोणत्याही मूलतत्त्वाच्या अणूमध्ये विशिष्ट संस्थेच्या Protons व Neutrons (एकमेकांशी घट्ट जोडलेल्या) चे एक घनकेंद्र असते व केंद्रात जेवढे Protons तेवढेच Electrons या केंद्राभोवती निरनिराळ्या कक्षांत अतिशय जलदगतीने फिरत असतात. थोडक्यात हे अणू म्हणजे आपल्या सूर्यमालेच्या अतिशय सूक्ष्म अशा जणू प्रतिकृतीच होत असे समजण्यास हरकत नाही. आता Protons आणि Neutrons या मूलभूत कणांचे मूळ शोधण्याचे शास्त्रज्ञांचे प्रयत्न सुरू झाले. एखाद्या वस्तूच्या आत काय आहे ते बघण्यासाठी ती वस्तू ज्याप्रमाणे आपण फोडतो, त्याप्रमाणे अणूतील केंद्र फोडण्यासाठी साधन शोधण्याचा प्रयत्न सुरू झाला व त्या परिणामी Cyclotrons या यंत्राचा शोध लागला. हे यंत्र तयार करण्यात शास्त्रज्ञांना व तंत्रज्ञांना यश आले. या यंत्रात एका गोलाकार मार्गावर Neutrons ना पळविण्यात येते व दर आवर्तनाला (मॅग्नेटिक फील्ड) चुंबकीय क्षेत्राच्या साहाय्याने त्यांची गती वाढविली जाते व अशा अतिशय महान गतीने धावणाऱ्या न्यूट्रॉन्सचा मारा अणुकेंद्रावर केला जातो. त्यामुळे ते अणुकेंद्र फोडले जाते. पण या प्रक्रियेत वस्तुमानाच्या अंतिम सूक्ष्म रूपाचे (अणूचे) आणखीन अंतरीय

घटकात रूपांतर होण्याऐवजी, काही वस्तुमानच नाहीसे होऊन त्यातून फार मोठ्या प्रमाणात ऊर्जा निर्माण होते असे आढळून आले आणि त्यामुळे विसाव्या शतकच्या सुरुवातीपर्यंतचे पदार्थविज्ञानाचे दोनही सिद्धान्त (Matter cannot be destroyed and Energy cannot be created) खोटे ठरले. अति थोड्या वस्तुमानातून अतिशय मोठ्या प्रमाणावर ऊर्जा कशी तयार होते याचे $E=mc^2$ हे सूत्र आइन्स्टाइनने जगाला दिले. याप्रमाणे वस्तुमानाचे (Matter) मूळ ऊर्जेत (Energy) व ऊर्जेचे मूळ वस्तुमानात असल्याचे शास्त्रज्ञांना ज्ञात झाले. परंतु तरी आधी वस्तुमान का आधी ऊर्जा निर्माण झाली हा प्रश्न आधी अंडे का आधी कोंबडी या प्रश्नाप्रमाणे अनुत्तरितच राहतो. वस्तुमान व ऊर्जा या दोन मूलभूत गोष्टी एकमेकांपासून निर्माण होत असल्या तरी त्यांना मूलतः निर्माण करणारी कोणतीतरी तिसरीच स्वयंभू शक्ती असली पाहिजे अशा निर्णयाप्रत आता शास्त्रज्ञ येऊ लागले आहेत.

सर्वांत मोठी संख्या कोणती या प्रश्नाचे उत्तर आपण कधीच देऊ शकत नाही. कारण कोणतीही आपल्याला कल्पना करता येईल अशी मोठी संख्या घेतली तरी तिच्यावर एक शून्य दिल्यास त्या संख्येच्या दसपट मोठी संख्या तयार होते. अशी प्रक्रिया आपण अनंत काळापर्यंत चालू ठेवली तरी आपल्याला सर्वांत मोठी संख्या सापडू शकणार नाही. म्हणून गणितशास्त्रात अशा कल्पनातीत संख्येला अनंतता (Infinity) असे नाव देऊन ती $\infty$ या चिन्हाने दाखवून निर्वाह करावा लागला. असाच काहीसा प्रकार वैज्ञानिकांना या सर्व दृश्य विश्वाचे मूळ कारण शोधण्याच्या प्रक्रियेत अनुभवास आला. कारण 'कार्य-कारण' भावाची शृंखला, महत्तम संख्या शोधण्याच्या प्रक्रियेप्रमाणेच कधीच न संपणारी ठरते. गणितशास्त्रात ज्याप्रमाणे 'अनंतता' $\infty$ (Infinity) या काल्पनिक चिन्हाने महत्तम संख्येचा प्रश्न सोडवला गेला त्याप्रमाणेच वेदविद्येने (अध्यात्मशास्त्रात) जे सर्वांचे 'आदी' आहे, पण ज्याला 'आदी' (कोणी) नाही, अशा स्वयंभू ब्रह्मतत्त्वाच्या कल्पनेने, कार्य-कारणभावाच्या कधीही न संपणाऱ्या शृंखलेला खंडित करून अध्यात्म तत्त्वज्ञानाचा पायाच घातला आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. विश्वनिर्मितीच्या मूळ कारणाच्या शोधात असलेल्या भौतिक वैज्ञानिकांस, विज्ञानशास्त्राची महत्तम प्रगती होऊन या मार्गावर खूप पुढे गेल्यावरसुद्धा' शेवटी 'Causeless Cause' च्या सिद्धान्ताचा आश्रय घ्यावा लागत आहे.

ज्याप्रमाणे भारतीय गणितशास्त्रज्ञांनी सर्व जगाला 'शून्य' आणि 'अनंतता' या दोन गोष्टींची एक अनमोल भेट दिली आणि त्यामुळे प्रगत गणिताचा विकास होऊ शकला, त्याप्रमाणेच भारतीय ऋषींनी वेदान्त तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून सर्वांचे 'आदी' अशा स्वयंभू ब्रह्मतत्त्वाच्या सिद्धान्ताची (कल्पनेची)जगाला भेट दिली आहे, असे म्हणणेही रास्त ठरेल. ही सर्वादी ब्रह्मतत्त्वाची कल्पना पाश्चात्त्य तत्त्वज्ञानांनाही पटली आहे व जगातील भौतिकशास्त्रज्ञांनाही पटण्याच्या मार्गावर आहे.

ही सर्व चराचर सृष्टी त्या मूळ स्वयंभू परमतत्त्वापासून निर्माण झाली आहे, असे वेदविद्या सांगते. ऐतरेय-उपनिषदात हाच मुख्य विषय चर्चिला आहे. हे ब्रह्मतत्त्व सृष्टीचे केवळ निर्माते नसून पोषिते व नाशितेही आहे असेही वेदविद्या सांगते. इतकेच नव्हे तर ते ब्रह्मतत्त्व सर्व विश्वाला व्यापून राहिले आहे असे पुढील

सिद्धान्तही निरनिराळ्या उपनिषदांतून सांगितले आहेत. सर्व उपनिषदांचे 'सार' अशा भगवद्गीतेत, या सिद्धान्तांवर कशी वचने आली आहेत ते पाहू या. भ. गीतेत मुख्य प्रतिपाद्य विषय जरी निराळा असला तरी संवादाच्या ओघात सर्व चराचर सृष्टीचा निर्माता जे आदितत्त्व 'ब्रह्म' म्हणजे मीच आहे या अर्थाची वचने भगवान कृष्णाच्या तोंडी अनेक ठिकाणी आली आहेत.

गी.अ.१०/२
न से विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः।
अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः॥२॥

मराठीत :-
महर्षी देवगणही माझा जन्म न जाणती।
कारणें सर्वशः त्यांचा आदिकारण मूळ मी॥२॥

इथे भगवान सांगतात - ''माझी उत्पत्ती (कशी व कोठे झाली) देवांना व महर्षींनाही कळू शकत नाही, कारण त्या सर्वांचाही मी (ब्रह्मत्त्व) आदी आहे.''

गी.अ.१० श्लोक ८
अहं सर्वस्य प्रभवः मत्तः सर्वं प्रवर्तते।
इति मत्त्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः॥८॥

मराठीत :-
मी असे मूळ सर्वांचा मी असे त्यांची प्रेरणा।
जाणून हे परंभावें ज्ञानी ते भजती मला॥८॥

भगवान सांगतात - ''मी सर्वांचे उत्पत्तिस्थान व माझ्यापासून सर्व वस्तूंची प्रवृत्ती, हे जाणून शहाणे (जाणणारे) पुरुष अनन्यभावाने मला भजत असतात.''

गी. अ.९ श्लो. १०
मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम्।
हेतुनानेन कौन्तेय जगद्विपरिवर्तते॥१०॥

मराठीत :-
अध्यक्षीं निर्मितो माझ्या मी ही सृष्टी चराचर।
घडामोड जगाची या चालते याच कारण॥१०॥

भगवान सांगतात - ''मीच पुढाकार घेऊन प्रकृतीकडून सर्व चराचर सृष्टी प्रसवितो आणि याच कारणामुळे जगाची ही घडामोड चालली आहे.''

गी.अ.१० श्लोक ३९
यच्चापि सर्व भूतानां बीजं तदहमर्जुन।
न तदस्ति विना यस्यान्मया भूतं चराचरम्॥३९॥

मराठीत :-
जे बीज सर्व भूतांचे असे मी तेच अर्जुन।
माझ्याविना नसे काही वस्तु स्थावर जंगम॥३९॥

भगवान सांगतात - ''ही सर्व भूते माझ्यापासूनच निर्माण होतात, मीच त्यांचे मूळ बीज आहे. माझ्या (अंशा) विना या विश्वात कोणतेच चराचर भूत (सापडणार) नाही.''

वेदान्त-तत्त्वज्ञान स्पष्ट करून सांगणाऱ्या उपनिषदांबरोबर त्याच काळात रचल्या गेलेल्या षड्दर्शनांपैकी कापिल-सांख्यदर्शनाचेही अध्यात्मशास्त्राच्या क्षेत्रात मोठेच योगदान आहे. भ. गीतेच्या १० व्या अध्यायात आपल्या प्रमुख विभूती सांगताना भगवंताने 'सिद्धातां कपिलो मुनिः' असे सांगून कपिलमुनींचा गौरव केला आहे. सृष्ट्युत्पत्तिक्रमासंबंधाने सांख्यशास्त्राचे बरेचसे सिद्धान्त वैदिक तत्त्वज्ञानास धरून असल्यामुळे गीतेस मान्य असले तरी पुरुष आणि प्रकृती हे सांख्यांचे द्वैत (वेदान्त-तत्त्वज्ञानात) गीतेस मान्य नाही. कापिल-सांख्यशास्त्रात अचेतन म्हणजे जड 'प्रकृती' आणि सचेतन 'पुरुष' अशी दोन स्वतंत्र आणि स्वयंभू तत्त्वे सांगून या दोन तत्त्वांपासून पुढे सृष्टीतील सर्व पदार्थ

उत्पन्न झाले असे विशद केले आहे. पण गीतेस हे द्वैत कबूल नसल्यामुळे गीता ७ व्या अध्यायाच्या ४ थ्या व ५ व्या श्लोकात काय सांगते ते पाहा :

भूमिरापोनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च।
अहंकार इतियं से भिन्ना प्रकृतिष्टधा ॥४॥
अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पत्रम्।
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥५॥

मराठीत :-
भू, आप, तेज, आकाश, वायू, बुद्धी व मानसा -।
अहंकारासहित ही माझी प्रकृति अष्टधा ॥४॥
अपरा ही परी अन्य माझी प्रकृति जी परा।
श्रेष्ठ जीवस्वरूपी ती जाण जी धारि या जगा ॥५॥

भगवान सांगतात - पंचमहाभूते, मन, बुद्धी व अहंकार अशा आठ घटकांची माझी अष्टधा प्रकृती आहे. ही अपरा म्हणजे कनिष्ठ प्रतीची प्रकृती झाली. या सृष्टीतील सर्व जड वस्तू आणि सजीवांचे देहसुद्धा या (दृश्य) अपरा प्रकृतीचेच घटक आहेत. परंतु सजीवांच्या शरीरांतील चैतन्य वा प्राण हे मात्र माझ्या (अदृश्य) 'परा' श्रेष्ठ प्रतीच्या प्रकृतीचे घटक आहेत. या परा प्रकृतीला पुरुष ही संज्ञाही वापरतात. या सृष्टीतील सर्व स्थावरजंगम गोष्टी अपरा प्रकृती व परा प्रकृती (पुरुष) यांच्या संयोगातून निर्माण होतात. 'प्रकृती' आणि 'पुरुष' यांना अनुक्रमे 'क्षेत्र' आणि 'क्षेत्रज्ञ' अशा संज्ञा देऊन गीतेमध्ये पुढे १३ व्या अध्यायात क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार मांडला आहे. या अध्यायाच्या २६ व्या श्लोकात भगवान सांगतात -

यावत्संजायते किंचित्सत्त्वं स्थावरजंगमम्।
क्षेत्रक्षेत्रज्ञ संयोगात तद्विद्धि भरतर्षभ ॥२६॥

मराठीत :-
जंगम स्थावर जी जी उद्भवे वस्तु या जगी।
क्षेत्र-क्षेत्रज्ञ संयोगें कारणें होय जाण ती ॥२६॥

भगवान सांगतात - हे भरतश्रेष्ठा ! या सृष्टीतील कोणतीही स्थावर किंवा जंगम वस्तू असो, ती क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्या संयोगापासूनच उत्पन्न होते हे ध्यानात ठेव.

कपिलांनी प्रकृती स्वतंत्र (स्वयंभू) मानली आहे. पण प्रकृती आपला संसार चालविण्यास स्वतंत्र नसून ती हे काम परमेश्‍वराच्या इच्छेने चालवीत असते असे गीतेचे मत आहे. प्रकृती हे माझेच स्वरूप आहे हे प्रथम सांगून सांख्यांचे द्वैत काढून टाकल्यावर सत्त्व, रज व तम या प्रकृतीच्या तीन गुणांमुळे सृष्टीतील नानाविध व्यक्त पदार्थ (सजीव व निर्जीव) कसे निर्माण होतात हे गीता १४ व्या अध्यायात ३ ऱ्या व ४ थ्या श्लोकात कसे सांगते ते पाहा :-

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधास्यहम्।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥३॥
सर्वयोनिषु कौन्तेय मूर्तयः सम्भवन्ति याः।
तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥४॥

मराठीत :-
योनी माझी महाब्रह्म ठेवी मी गर्भ त्यांतच
उत्पत्ती सर्व भूतांची घडते हेच कारण ॥३॥
सर्व योनींमध्ये पार्था, भूते घेतीच जन्म जी।
जननी प्रकृती त्यांची बीजदाता पिताच मी ॥४॥

वरील वर्णन काहीसे सांख्यविचारांसारखे वाटेल की काय, म्हणून पुढे १५ व्या अध्यायात क्षराक्षर विचारान्वये क्षर, जडाची 'अपरा' प्रकृती व अक्षराची 'परा' प्रकृती या दोघांना पुरुष हीच संज्ञा देऊन भगवान सांगतात -
द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोक्षर उच्यते ॥१५॥

मराठीत :-
पुरुष दोन विश्वात असती क्षर अक्षर ।
नश्वर क्षर भूते ती अंतरी जीव अक्षर ॥१५॥

सर्व भूतमात्रांचे शरीर (जड) अपरा प्रकृतीचे घटक असून नश्वर म्हणजे नाशिवंत असते, तर त्या देहातील 'चैतन्य' किंवा 'प्राण' हे परा-प्रकृतीचे अक्षर-पुरुषाचेच अंशरूप असते.

आता पुढच्या १६ व्या श्लोकात काय सांगितले आहे ते पाहा :-

उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः॥१६॥

मराठीत :-
परी पुरुष जो अन्य परमात्माचि उत्तम ।
व्यापी त्रैलोक्य पोषी जो अविकारीच ईश्वर ॥१६॥

सांख्यांच्या 'पुरुष' आणि 'प्रकृती' या द्वैतातील घटकांना (७ व्या अध्यायात) अनुक्रमे 'परा' व 'अपरा' प्रकृती संबोधून व पुढे क्षराक्षर विचारान्वये 'क्षर' व 'अक्षर' असे दोन (कनिष्ठ) पुरुष संबोधून या दोन्ही पुरुषांपेक्षाही अन्य असा उत्तम पुरुष तोच 'परमात्मा' म्हणजे या विश्वाचा निर्माता, पोषिता व नाशिता असून तोच सर्व विश्वाला व्यापून आहे आणि तोच सर्व विश्वाचा 'निर्गुण, निराकार, इंद्रियातीत असा 'आदी' आहे असे दाखवून दिले आहे. याप्रमाणे गीतेत कापिल सांख्यशास्त्राच्या प्रकृती-पुरुष द्वैताचा आणि वेदान्तातील अद्वैताचा (एकच परमात्मा) जणू मेळच घातला आहे असे दिसून येते.

या इंद्रियांना अगोचर व शब्दांनी वर्णन न करता येणाऱ्या अशा ('परमात्मा') ब्रह्मतत्त्वाचे वर्णन वैदिक वाङ्मयात 'त्रिगुणातीत', 'त्रिकालातीत' 'त्रिअवस्थातीत', देहत्रयातीत असे केले आहे व त्याचा उल्लेख करण्यासाठी ॐ (अ, उ, व म् आणि ँ) या बीजाक्षरमंत्राची योजना केली आहे. ॐ या एकाक्षराने निर्देशित निर्गुण ब्रह्मतत्त्वाचे कल्पिलेले (पहिले) सगुण रूप म्हणजे 'गणपती' होय. ऋग्वेदात या ब्रह्मतत्त्वाचा उललेख 'ब्रह्मणस्पत' या संज्ञेनेच होत असे. 'गणपति' या संज्ञेचा उल्लेख प्रथम अथर्ववेदातच झाला आहे. गणपति-अथर्वशीर्षात या ब्रह्मतत्त्वाचे वर्णन विश्वाचा कर्ता-धर्ता- हर्ता त्याचप्रमाणे 'गुणत्रयातीत, देहत्रयातीत, कालत्रयातीत आणि अवस्थात्रयातीत' असेच केले आहे आणि ब्रह्मा, विष्णू, महेश, पंचमहाभूते आणि इतर देवता ही त्या ब्रह्मतत्त्वाचीच (काल्पनिक) सगुण रूपे आहेत असे म्हटले आहे.

ज्ञानोबांनी ज्ञानेश्वरीच्या मंगलाचरणाची सुरुवात 'ॐ नमोजी आद्या । अशीच करून त्या निर्गुण ब्रह्मतत्त्वालाच प्रथम आवाहन केले आहे आणि मग दुसऱ्या ओळीत त्या ब्रह्मतत्वाचे सगुण रूप अशा गणपतीचा 'देवा तूचि गणेशु ।' असा उल्लेख केला आहे.

'हे चराचर विश्व, सर्वांचे आदी अशा निराकार इन्द्रियातीत आणि स्वयंभू ब्रह्मतत्त्वापासून निर्माण झाले आहे' ह्या वेदविद्येच्या पहिल्या मूलभूत सिद्धान्तावरचे विवरण येथे समाप्त झाले.

'हे ब्रह्मतत्त्व सर्व चराचर विश्वाला अदृश्य स्वरूपात व्यापून राहिले आहे' या वेदविद्येच्या दुसऱ्या सिद्धान्तावर विवरण पुढील लेखात.

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

## ''अर्धनारीनटेश्वर देवाधिदेव महादेव स्वरूपवर्णन''

**आचार्य वसंत गोडबोले**

''नमः शिवाभ्यां नवयौवनाभ्यां परस्पराश्लिष्टवपुर्धराभ्याम्।

नगेन्द्रकन्या-वृषकेतनाभ्यां नमो नमः शंकरपार्वतीभ्याम्।''

अर्थ :- कल्याण करणाऱ्या, नवयौवनयुक्त, परस्परआलिंगित शरीर असलेला नमस्कार. वृषभचिन्ह ज्याच्या ध्वजावर आहे अशा शंकराला व पर्वतकन्येला वारंवार नमस्कार.''

श्रीमहादेवांची उपासना आसेतुहिमाचल या भारतात अनादी कालापासून सुरू आहे. भगवान शंकरांना भारतीय जनजीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. भगवान शंकरांची पूजास्थाने (शिवालये) भारतात सर्वत्र आढळतात. शिवपुराण तसेच अन्य शिवउपासना ग्रंथ, स्तोत्रे शिवोपासकांमध्ये प्रचलित आहेत. शंकर या शब्दाचा अर्थच ''शं करोति इति शंकरा'' म्हणजे शुभ करणारा तो शंकर - शं म्हणजे शुभ असा आहे. त्या भगवान शंकरास अनेक नावांनी संबोधिले जाते. सदाशिव, अर्धनारीनटेश्वर, देवाधिदेव महादेव, शंकर, पशुपतिनाथ इ.इ. त्यांना सृष्टिलयकर्ता संबोधिले जाते. त्यांचा महामृत्युंजय मंत्र तसेच ॐ नमः शिवाय हा मंत्र व बारा ज्योतिर्लिंगांचा श्लोक प्रसिद्ध आहेत. शंकरांचे प्रतीक म्हणून शिवलिंग / शिवपिंडीचे पूजन केले जाते. शिवमंदिरातही शिवपिंडीच असतात.

भगवान शंकरांचे वर्णन असे करता येईल की ज्यांच्या मस्तकातून ज्ञानगंगा वाहते, जे चारित्र्याचे उज्ज्वल शिखराधिष्ठित आहेत, उत्तुंग व धवल अशा शिखरावर विराजमान आहेत, साधेपणा हाच त्यांचा श्रृंगार आहे, विभूती हेच वैभव, सुजनरक्षण व खलनिर्दालन हे व्रत आहे, प्रेम हा स्थायिभाव, जगरक्षणासाठी हलाहल प्राशन करणारे, जगरक्षणहितैषीपणा ही ज्यांची कल्याणवृत्ती, बालेन्दुला मस्तकी धारण करून खऱ्या कर्मयोग्यास मान देणारा, कल्याण व ज्ञान यांचे साक्षात मूर्तिमंत रूप असणाऱ्या, संहारासाठी त्रिशूळ व संगीतासाठी डमरू धारण करून संहार व संगीत बाळगणाऱ्या, मृत्यू भयानक घटना नाही याचे ज्ञान देण्यास स्मशानवास करणाऱ्या व मृत्यू म्हणजे जिवाचे शिवभेटीस जाणे हे याद्वारे सूचित करणाऱ्या भगवान शंकरास अनंतकोटी प्रणाम.

महादेवाच्या प्रतीकात्मक रूपाचे वर्णन करण्यासाठी हा लेख असल्याने या प्रास्ताविकानंतर त्यास प्रारंभ करून त्या रूपाचे वर्णन म्हणजे भावार्थ विशद करण्याचा अल्पमतीने प्रयत्न करतो.

शिवशंकराची उपासना दोन प्रकारे करतात. १) शिवलिंग, २) शिवमूर्ती

शिवलिंग हे अव्यक्ताचे मूर्त प्रतीक आहे. बहुतेक शिवमंदिरांत शिवलिंगाचीच पूजा होते. पूजेतील ही शिवलिंगे दोन प्रकारची असतात. १) मानवनिर्मित २) प्राकृतिक/नैसर्गिक - जसे अमरनाथ येथे गुहेत तयार होणारे बर्फाचे शिवलिंग. तसेच अनेक ठिकाणी शिवमंदिरातील

शिवलिंग पृथ्वीतून वर आलेले स्वयंभू असे सांगतात तसेच काही ठिकाणी प्रत्यक्ष शंकरानेच दिलेले शिवलिंग आहे असे सांगितले जाते. असे गोकर्ण महाबळेश्वर, रामेश्वर इ. इ. केदारनाथ व पशुपतिनाथ नेपाळ येथे तर शिवशंकराचे वृषभरूपातील अवयव म्हणजे अनुक्रमे वशिंड व मुख शिवपूजेचे मूर्तिरूप मानतात. प्रसिद्ध बारा ज्योतिर्लिंगेही अशाच प्रकारे स्वयंभू व जागृत मानतात. अर्थात याला ऐतिहासिक पुरावे नाहीत तर पुराणे व परंपरागत चालत आलेल्या लोककथा यांवरच जनतेचा विश्वास आहे. हा श्रद्धेचा प्रश्न आहे. त्यामुळे त्यावर अधिक भाष्य न करणेच बरे. या प्रसिद्ध द्वादश ज्योतिर्लिंगांपैकी प्रत्येक ज्योतिर्लिंगाचे स्थानमाहात्म्य, उत्पत्ती यांवर पौराणिक पोथ्या इ. साहित्यही प्रसिद्ध असून प्रत्येकाचे जनमानसात अढळ स्थान आहे व श्रद्धेने त्यांचे पूजन, यात्रा इ. केली जाते. इतरही शिवलिंगस्थाने त्या त्या परीने अशाच कथा व लोकश्रद्धा यांमुळे जनमानसात स्थान मिळवून आहेत.

शिवलिंगाचे जनमानसात, आध्यात्मिक लोकांत व शिवभक्तांत मान्य प्रतीक अर्थ असे आहेत -

अ) शिवलिंगाचा अण्डाकार ब्रह्माण्डाचे प्रतीक आहे.

ब) शिवलिंग आत्म्याचे प्रतीकआहे.

क) शिवलिंग हे जीव व शिव यांच्या एकीकरणाचे प्रतीक आहे.

ड) शिवलिंग हे निराकार शिवाचे प्रतीक आहे. जे शांकर अद्वैत दर्शनच्या ''ब्रह्म'' समान व तुल्य आहे (येथे ब्रह्म म्हणजे ब्रह्मा वा ब्रह्मदेव नाही तर परब्रह्म असा अर्थ आहे हे लक्षात घ्यावे). हे शिवाचे विशुद्ध रूप आहे. याचे शब्दांत वर्णन शक्य नाही कारण ते शब्दातीत आहे. हे अनुभव /अनुभूती देणारे अनुभूतिगम्य आहे. ज्या योग्यांना याची प्रचिती /अनुभूती आली त्यांनी परमानंदानुभूतीचे संकेत दिले आहेत. हे ब्रह्माण्डाच्या सत्तेचे परम कारण आहे.

शिवसंप्रदायातील बसवेश्वरांच्या वीरशैव वा लिंगायत संप्रदायाचे हे वैशिष्ट्य आहे की त्या संप्रदायात शिवपूजा केवळ शिवलिंगरूपातच होते व या संप्रदायाचे अनुयायी शरीरावर नेहमी इष्टलिंग धारण करतात. कोणी गळ्यात तर कोणी कमरेला हे इष्टलिंग धारण करतात.

हे शिवलिंग काही मंदिरांत चारमुखी असते. यालाच पंचमुखी शंकर म्हणतात. चार दिशांना चार व मध्यभागी एक हे अदृश्य म्हणून असते. पंचमुखी शिव हे अनन्त शिवाचेच एक रूप आहे.

पुराणांमध्ये शिवलिंगाची विभिन्नता वर्णन केली आहे. त्यानुसार ब्राह्मणांनी पारद लिंग (रस-पारद म्हणजे पाऱ्याचे बनविलेले), क्षत्रियांकरता बाण, वैश्यांकरता सुवर्णाचे व अन्यांकरता शिळेचे म्हणजे पाषाणाचे लिंग पूजेसाठी वापरावे असे प्रतिपादन केले आहे. स्त्रियांकरता पार्थिव व विधवांसाठी पाऱ्याचे व जे पुरुष जीवनाचा उर्वरीत काळ धर्मपालनात व्यतीत करतात त्यांनी स्फटिकाचे शिवलिंग पूजेसाठी वापरावे हे उत्तम असे सांगितले आहे. या लिंगाचा पूजेनंतर प्रसादही ग्रहणयोग्य असतो.

बाणलिंगाचे वैशिष्ट्य असे आहे की ते नर्मदाजलातीलच असावे व तेथूनच म्हणजे नर्मदा नदीपात्रातूनच मिळालेले वा काढलेले असावे. जो बाण पाच वेळा तराजूत तोलल्यानंतरही समान होत नाही तेच बाणलिंग सर्वोत्तम समजतात. पाषाणातून बनवलेले लिंग तलावात सोडून देऊन जर तेच पुन्हा मिळाले तर ते लिंग बाणलिंगस्वरूप होते. कलियुगात पार्थिवेश्वर लिंगाच्या पूजेचे मोठे महत्व आहे. आपल्या मनीषा प्रकट करून विधिपूर्वक पार्थिवेश्वर लिंगाची पूजा करण्याने सर्व मनःकामना पूर्ण होतात. शैव अनुचारांना कमळतंतू (कमळपराग), फुलांचे पराग, मोती, चांदी, सोने, पारा, यांचे तसेच पार्थिव (मातीचे) शिवलिंग करून त्याची पूजा करण्यास पुराणात सांगितले आहे.

नर्मदा नदी ही शिवपुत्री समजली जाते त्यामुळे नर्मदेतील प्रत्येक दगड शंकर म्हणूनच मानतात. तसेच तिच्यात सापडणारे लाल दगड/ खडे गणपती म्हणून पूजतात. नर्मदेचे नाभिस्थान नेमावर असून श्रीतीर्थ धारा योनिस्थान आहे. हे श्रीधारा धावडीगोवाजवळ (मूळ नाव धायरी) असून धावरीकुंड म्हणतात - याचे वैशिष्ट्य म्हणजे या कुंडात स्वयंभू शिवलिंगे निघतात त्यांना बाणलिंगे म्हणतात. श्रीबाणलिंगे- नर्मदेतील दगडावर पाणी घातले असता ते अमृतमय होते असे पुराणप्रमाण आहे. तसेच नर्मदेतील प्रत्येक शिलाखंड शिवस्वरूप आहे म्हणून ''नर्मदाका कंकर, वही है शंकर'' असे म्हणतात. तसा पुराणातही उल्लेख आहे. साधा पाषाणही अमृतमय व शिवस्वरूप तर प्रत्यक्ष बाणलिंगांचा महिमा काय वर्णावा? भगवान शंकरांनी त्रिपुरासुराचा वध केल्यावर बाणासुराच्या देहाचा अतिशय दाह होऊ लागला व त्याने शिवलिंगार्चना करून शिव प्रसन्न झाल्यावर वर मागितला.

''त्वत्प्रसादान्महादेव मा मे लिंग प्रणश्यतु।
गृहणद्भिः परयाभक्त्या बाणलिंग परंपरः॥''

तेव्हापासून नर्मदेतील शिवलिंगांस बाणलिंग म्हणतात. धावरी कुंडातील लिंगे विशेष समाजतात. या धावरी कुंडात नर्मदेचा प्रपात ५०-६० फुटांवरून पडतो. प्रवाहातून जे दगड वाहत येतात त्यांतील ज्यांत चैतन्य असेल तेच दगड कुंडात पडून भोवऱ्याच्या घर्षणाने गोलाकार होतात. ही लिंगे कुंडात ५०-६० फूट खोलात मिळतात, परंतु नर्मदेच्छा. धावरी कुंडात विचित्रवर्णी, लहानमोठे बाण मिळतात. त्यांत कपूरेश्वर, अमृतेश्वर, केदारेश्वर, लोहितेश्वर, चंद्रशेखर, चंद्रमौलीश्वर, नीलकंठ, त्रिजटेश्वर, नागेश्वर, नंदिकेश्वर, अर्धनारीनटेश्वर, उमामहेश्वर, भस्मांगशिव इ. बाण विशेष समजतात.

निराकार परमेश्वराचे साकार रूप म्हणजेच बाणलिंग. सूक्ष्मागमात म्हटले आहे -

''लिंगे संपूजिते तस्मिन् पूजिताः सर्व देवतम्॥''

नर्मदाकिनारी स्वयं प्रकट झालेली श्रीमहादेवाची २८ लिंगे आहेत. ती या स्वयंभू शिवलिंग या निमित्ताने माहितीसाठी अशाकरता देत आहे. नर्मदा शिवकन्या असल्याने जेथे नर्मदा तेथे शंकर हे सिद्ध आहे. (जिच्या उत्तर तटाला त्रिपुरी या तीर्थक्षेत्री १०८ स्वयंभू शिवलिंगे आहेत.)

२८ लिंगे येणेप्रमाणे - स्थानेश्वर, महादेव, शूलपाणीअपरसत्येश्वर, कल्पेश, हिरण्य, जातवेदा, प्रजापत्य, सिद्धनाश, शशांकनयन, अनुकेश, स्कन्द, आश्विन, तेजस, ब्रह्मेश्वर, अग्निगर्भ, श्रीकष्ठ, त्र्यंबक, उमापती, नीलकण्ठ, खट्वाङ्ग, महाकाल, घटेश्वर, त्रिलोचन, देवदेव, महेश्वर, अनंगलिङ्ग, कामदेवलिङ्ग, सिद्धमन्वंतरलिङ्ग.

शिवमूर्तीः- शिवमूर्ती विविध रूपांत व विविध प्रकारांत असते. अनेक पुरातत्त्व संशोधक व अभ्यासू विद्वानांनी यावर बरेच संशोधन करून त्या विविध रूप व प्रकारांतील मूर्तींचे विश्लेषण व मीमांसा केली आहे. मूर्तिकलेच्या दृष्टिकोनातून पाहिले असता मंदिरांत खालील प्रकारच्या शिवमूर्ती अधिक प्रमाणात आढळतात. त्या मूर्तींचे वैशिष्ट्य या लेखात संक्षेपात देत आहे. या प्रकारांशिवायही अनेक प्रकारच्या शिवमूर्ती वेगवेगळ्या शिवमंदिरांत आहेत, त्या विविध कलाकार/शिल्पकारांच्या प्रतिभेनुसार तसेच काही शिवलीलांवरून केलेल्या आहेत. त्यांची मान्यता त्या त्या स्थानापुरतीच मर्यादित असून त्यांचे माहात्म्य फारसे प्रसिद्ध नाही. कोठेही स्वयंभू शिवमूर्ती असल्याचे माझ्या ऐकिवात व वाचनात नाही.

अ) दक्षिणामूर्ती :- ही मूर्ती चतुर्भुज असते. या मूर्तीत त्रिशूल, डमरू, सर्प, चंद्र, जटाभार, गंगा आदी शिववैशिष्ट्ये दाखविलेली असतात.

ब) अर्धनारीश्वरमूर्ती :- मूर्तीच्या डाव्या भागात शिवत्रिशूल, कमंडलू, सर्प, जटाभार, नरकपाल आदी असतात.

क) नटराजमूर्ती :- शिवतांडव नृत्य प्रदर्शित करणारी ही मूर्ती. यात शिवशंकराचे नटराजरूप अंकित केलेले असते. नृत्यकलेची देवता म्हणजे नट व राज म्हणजे भगवान म्हणून नटराज. यात शिवरूप चतुर्भुज असते. ते खालील वैशिष्ट्ये दाखविते.

१) उजव्या (वर केलेल्या) हातात डमरू

२) डाव्या (वर केलेल्या) हातात अग्नी

३) (खाली केलेला) उजवा हात अभयमुद्रा

४) डावा (खाली केलेला) हात वर उचललेल्या पायाकडे संकेत करणारा

५) उजव्या पायाखाली अपस्मारअसुर वा दैत्य दाबलेला

६) डावा पाय हत्तीच्या पायाच्या आकृतिरूपात समोर उचललेला

७) चारी दिशांना/सर्वत्र गोल अग्निवलय/अग्निज्वाळा

८) जटाभार/केस विखुरलेले, मुक्त उडणारे.

या नटराज शिवाचे मुख्य मंदिर तामीळनाडूत चिदम्बरम येथे आहे. दक्षिण भारतातील इतर शिवमंदिरांत मुख्य लिंगमंदिर वा शंकरांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या मूर्ती आहेत. ज्यांच्या आजूबाजूस बहुतेक एक नटराजमंदिर वा नटराजाचे चित्र असतेच.

मूर्तिस्वरूप कोणतेही असो, भावना महत्त्वाची असते. यासंबंधी एक श्लोक असा आहे.

''न देवो विद्यते काष्ठे न पाषाणे न मृण्मये।
भावे हि विद्यते देवो तस्मात् भावो हि कारणम्॥''

अव्यक्ताची उपासना फार कष्टदायी आहे.

श्रीमद्भगवद्गीतेत यासंबंधी असा श्लोक आहे -

''क्लेशोऽ धिकतरस्तेषामव्यक्ता सक्तचेतसाम्।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते।।''

म्हणजे अव्यक्तात चित्र एकाग्र करण्याची इच्छा असणाऱ्याला अत्यंत कष्ट होतात. कारण देहेन्द्रिय धारण करणाऱ्या मनुष्याला अव्यक्ताची गती प्राप्त करणे हे स्वभावतःच अत्यंत कष्टदायी आहे.

साधनेमध्ये मूर्तीत दीर्घकाळ मन स्थिर करण्याची साधना हा मनुष्याचा प्रयत्न व त्यानंतर एकाएकी मूर्तीचा लय होणे व पूर्णतेची अनुभूती येणे ही ईश्वरकृपा व या दोन्हीचे एकत्र होणे वा मीलन जेव्हा साधले जाते तेच मनुष्याच्या जीवनाच्या परमोच्च अवस्थेचे दर्शन होय. मनुष्याला उद्धरण्याची शक्ती निर्जीव मूर्तीत नाही तर त्यामागच्या भावनेत आहे. परब्रह्म या आकारात/मूर्तिप्रकारात आहे ही भावनाच मूल्यवान, म्हणून मूर्तीची जेव्हा ''प्राणप्रतिष्ठा'' करतात त्या क्षणी ती प्रतिमा मूर्ती न राहता प्रत्यक्ष परमेश्वर, परब्रह्म बनते. हे या निमित्त्याने लिहिणे योग्य वाटते व ते सर्व देवदेवतांच्या मूर्तिपूजनास लागू आहे.

शिवमूर्तीमध्ये महत्त्वाची जी प्रतीके असतात त्यांसंबंधीचे वर्णन प्रतीकनिहाय असे आहे.

१) त्रिशूल :- हे शंकराचे आयुध/शस्त्र समजले जाते. त्याचे प्रतीकात्मक अर्थ अनेक आहेत.

अ) एक अस्त्र या अर्थाने त्या रूपात अभद्र, अमंगल, वाईट गोष्टी नष्ट करण्याची क्षमता असल्याचे ते प्रतीक आहे.

ब) त्रिशूलाची तीन टोके ही सृष्टीच्या उत्पत्ती, स्थिती व लय या अवस्थांचे प्रतिनिधित्व करतात. शैव संप्रदायिकांना शिवच या तिन्ही अवस्थांचे अधिपती वाटतात.

क) हा पशुपती, पशू व पाश यांचे प्रतिनिधत्व करतो असे शिवसिद्धान्त म्हणून मानतात.

ड) प्रकृतीच्या सत्त्व, रज, तम या गुणांचे हा प्रतिनिधित्व करतो.

इ) महाकालेश्वराच्या तीन काळांचे (वर्तमान, भूत व भविष्य) द्योतक आहे.

फ) स्वपिंड, ब्रह्माण्ड व शक्ती यांचे परमपदाशी असलेले एकत्व दर्शवितो.

ग) डाव्या बाजूस स्थित इडा, उजव्या बाजूस स्थित पिंगला व मध्यभागी स्थित सुषुम्ना नाडी यांचे द्योतक आहे.

ह) ज्योतिषशास्त्रानुसार हा मंगळाशी संबंधित आहे.

ज) सज्जनांचे रक्षण व दुर्जनांचा संहार करणारे ते ब्रीद किंवा प्रतीक आहे. त्रिशूल हे दाखवितो की सज्जनरक्षणासाठी शंकर सदैव जागृत आहेत, तसेच खलनिर्दालनार्थ ते सदैव कटिबद्ध आहेत. (दुर्जनांची लबाडी ते तत्काळ ओळखतात व आपल्या भोळ्याभाबड्या भक्तांचे दुर्जनांपासून रक्षण करतात. उदा. ईश्वराचे अस्तित्वच नाकारण्याचे कार्य त्यांना मान्यच नाही याचा दाखला देण्यासाठीच त्यांनी दक्ष प्रजापतीच्या यज्ञाचा नाश केला आहे.) शंकर भोळे नाहीत तर भोलानाथ म्हणजे भोळ्या लोकांचे रक्षक/नाथ आहेत.

२) डमरूः असे समजले जाते की नादाची उत्पत्ती भगवान शंकराच्या डमरू वाजवण्याने झाली. संगीतातले अन्य स्वर येतात जातात; पण त्यांमध्ये मुख्य केंद्रीय स्वर नाद आहे. अनुभवी व मुरलेले संगीतज्ञच या नादाचा आनंद घेऊ शकतात. या नादापासूनच वाणीची चार रूपे उत्पन्न झाली असे मानतात. त्या चार वाणी अ) परा ब) पश्यन्ती क) मध्यमा व ड) वैखरी. यांपैकी वैखरी वाणीतून अक्षर वा वर्ण उत्पन्न होतात, जे आपण भाषारूपात बोलतो त्याचा आधार वैखरी वाणीच आहे. परा-वाणी रूप महाबिन्दुच्या स्फोटापूर्वीची स्थिती आहे. त्यामुळे ही अगम्य व अनाकलनीय आहे. हे रूप कुंडलिनीच्या मूलाधार चक्रात अस्तित्वात असते. पश्यन्ती वाणी ही स्पंदनवाणीरूपात अस्तित्वात असते. तिची व्याप्ती/स्थान मूलाधार चक्र ते मणिपूर चक्र एवढी असते. मध्यमा वाणीचे दोन प्रकार आहेत. अ) मध्यमा शब्द, ब) मध्यमा अर्थ. यांपैकी मध्यमा शब्द ही मानसिक गती आहे तर मध्यमा अर्थ स्थूल वा मूर्त वस्तूची मानसिक प्रतिमा/छाप आहे. जेव्हा आपण कोणी उच्चारलेला शब्द ऐकतो तेव्हा आपल्या डोक्यात /मनात त्या शब्दाच्या द्वारा त्या वस्तूचा वा अस्तित्वाचा बोध होतो. हेच असते शब्दाचे अर्थग्रहण. अध्यात्मसाधनेत याचा एक विशिष्ट तसाच पारिभाषिक अर्थ आहे. हा कुंडलिनीजागृतीशी संबंधित आहे. हा अनाहत नादाचा विषय आहे. कोणत्याही आघाताशिवाय उत्पन्न झालेले चिदानंद अखंड, अगम्य तसेच अलखरूपी सूक्ष्म ध्वनी हे अनाहत नाद असतात. या अनाहत नादाचे दिव्य संगीत ऐकण्याने गुप्त मानसिक शक्ती प्रकट होतात. या अनाहत नादावर ध्यानाची एकाग्रता करण्याने हळूहळू समाधिअवस्थेकडे प्रगती होऊन समाधी लागू लागते. नादाच्या आधारावर साधकाने मनोलय केल्यास तो ब्रह्मरूप परमपदाशी एकात्मता मिळवू शकतो. डमरू हे या नाद-साधनेचे प्रतीक आहे. एक प्रकारे संगीताचे प्रतीक आहे. संस्कृतमध्ये ''संहार'' याचा अर्थ शृंगार वा सजावट असाही होतो. सर्जन व विसर्जन दोहोंच्या सहयोगानेच सृष्टीची सजावट सुंदर वाटते.

डमरू हे ज्ञानाचे उगमस्थान आहे. महर्षी पाणिनींना त्यांच्या व्याकरणाचे बीजमंत्र डमरूच्या आवाजातूनच सापडले होते अशी दंतकथा आहे. स्वतः भगवान शंकरांनी त्यांच्या कानाजवळ डमरू वाजवून हे ज्ञान त्यांना दिले असे म्हणतात. अशी कितीतरी रहस्ये भगवान शंकर सृष्टीतील संशोधकांच्या कानाजवळ डमरू वाजवून सांगतही असतील. ईशकृपेनेच मानवाला जगातील बहुतांशी शोध लागले आहेत असे मी मानतो, पण पाणिनींनी जसे प्रांजळपणे कबूल केले तशी दानत आजच्या मानवात नाही.

३) सर्प/नाग - भगवान शंकरांच्या एका ज्योतिर्लिंगाचे नाव नागेश्वर असे आहे. त्यावरून असे स्पष्ट होते की ते नागांचे ईश्वर आहेत म्हणूनच शंकरांचा नागाशी वा सर्पाशी अतूट संबंध आहे. भारतात नागपंचमीला नागपूजनाची परंपरा आहे. विद्वानांच्या मते नागपूजा ही आर्येतर संस्कृतीचा प्रभाव दाखविणारी आहे (द्रविड संस्कृती /अनार्य संस्कृती). परस्परविरोधी मतांमध्ये सामंजस्य घडविणारे शंकर भगवान नाग/सर्प यांसारख्ये क्रूर व भयानक प्राणी/जीव यांस गळ्यातला हार बनवतात. हा लपेटलेला नाग/सर्प निद्रिस्त, वेटोळे घालून बसलेल्या

कुंडलिनी शक्तीचे प्रतीक आहे. भगवान शंकर सर्पांना स्वशरीरावर खेळवतात. विषारी दात नसलेला नाग (ते दात पाडल्यावर) हानिकारक नाही तसे जे विषय निर्विष केले जातात ते पण नुकसानकारक नाहीतच. षड्रिपू- काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे जाणारे विकार नाहीत; पण ते उदात्त विचाराने संस्कारित केले तर कधीच बाधक/ हानी करणारे राहत नाहीत. यातून असेही सिद्ध होते की ज्ञानी पुरुष कुशलतेने सापासारख्या जहरी माणसाकडूनही चांगले कार्य करून घेऊ शकतात व ही जगात जहरी म्हणून समजली जाणारी माणसे ज्ञानी महापुरुषांजवळ राहून निर्विष व कार्यसाधक बनतात. भगवान शंकर नीलकंठ या नावानेही प्रसिद्ध आहेत. शिव म्हणजे मंगल/ कल्याणकारी काम करण्याची इच्छा असणाऱ्या मानवाने सतत विष / कटू घोट पचविण्याची हिंमत ठेवायला हवी. फक्त जेव्हा विष समुद्रमंथनातून निघाले तेव्हा सर्व देव-दानव पळाले. रत्ने मात्र सर्वांनी घेतली, अमृतही प्याले; पण विष/ हलाहल निघताच सर्व पळाले. अमृत पितात ते देव व जगकल्याणकरता विष पिणारे शंकर म्हणूनच ते महादेव. म्हणूनच ते नागेश्वर. नाग/सर्प गळ्यात मिरवणारे. सर्प/नाग हे प्रतीक याचसाठी.

४) चंद्रकोर - शंकरांच्या मस्तकी जी चंद्रकोर आहे ती बीजेची (गणपतीने धारण केलेली चतुर्थीची). बारा ज्योतिर्लिंगांपैकी एका ज्योतिर्लिंगाचे नाव सोमनाथ (सौराष्ट्रात आहे). असे सांगतात, चंद्राने त्याला लागलेल्या शापाच्या निवारणार्थ शिवलिंग स्थापून शिवोपासना केली व शापमुक्त झाला म्हणून त्या शिवलिंगास सोमनाथ म्हणजे चंद्राचा नाथ म्हणतात व हे शिवलिंग चंद्राच्या भक्तीने प्रसन्न झालेल्या शंकराचे प्रतीक आहे. चंद्र हा मनाचा कारक आहे. ''चंद्रमा मनसो जातः।'' असे म्हणतात. ज्योतिषशास्त्राच्या दृष्टिकोनातून चंद्र सत्त्वगुणी आहे. ज्या माणसाच्या कुंडलीत चंद्र उच्चीचा व शुभस्थानी, अशुभ ग्रहदृष्टी नसणारा असतो (अशुभ ग्रहाच्या दृष्टीत/योगात नसतो) त्या जातकाला/मानवाला सत्त्वगुणी व्यक्तित्व मिळते/त्याच्यात सत्त्वगुण प्रकट होतात आणि त्याप्रमाणेच त्याचे आचारविचार व राहणीही असते. शंकरांनी चंद्र धारण करून मनावरचे नियंत्रण दाखवले आहे. बीजेचा चंद्र हा कर्मयोग्याचे प्रतीक आहे. या चंद्रकोरधारणेने शंकरांनी दोन गोष्टी दाखविल्या आहेत.

अ) दुसऱ्यांचे गुण याप्रमाणे मस्तकी धारण करून दाखविण्याची दानत व हिमत ही ज्ञानवंताला महान बनवते. त्याचे गुणग्राहकत्व/ ''गुणी गुणं वेत्ति'' ही म्हण सिद्ध करते.

ब) बीजचंद्रकोर कर्मयोग प्रतीक म्हणून शंकर भगवान खऱ्या कर्मयोग्यालाच मस्तकी धारण करतात. उच्च स्थानी विराजमान करतात.

५) जटाभार - भगवान शंकर जटाजूटधारी आहेत. याबद्दल पुराणात अनेक प्रकारचे स्पष्टीकरण आहे. त्यांतले एक म्हणजे गंगावतरणाचे. गर्विष्ठ गंगेचा गर्व उतरविण्यासाठी त्यांनी तिला आपल्या जटाभरात अडकवून टाकले व नंतर तिची एक धार भगीरथपूर्वज शापमुक्त करण्यासाठी आणि लोककल्याणासाठी पृथ्वीवर प्रवाहित केली.

शिवमूर्तींमध्ये हा जटाभार समान रूपात दाखविलेला नाही. प्रत्येक मूर्तीत तो वेगळा आहे.

नटराजमूर्तीत (तांडवनृत्यरूपी मूर्ती) हा जटाभार विखुरलेला आहे व उडणाऱ्या केसरूपात आहे तर इतर मूर्तींत तो बांधलेला, मस्तकावर / डोक्यावर धारण केलेला दाखविला आहे. या दोन वेगळ्या प्रकारांचा प्रतीकार्थ काय असू शकेल? याचा विचार करता खालील अर्थ मला अल्पमतीने जसा समजला/वाटला तो देत आहे.

शिवजटाभार ब्रह्माण्डातील वेगवेगळ्या लोकांचे प्रतीक आहे. मोकळे, विखुरलेले व उडते केस विभिन्न लोकांतील परस्पर संतुलनचक्र / सामंजस्याचे विखुरलेले व ते नष्ट झाल्याचे प्रतीक आहे, तर बांधलेला जटाभार विभिन्न लोकांतील संतुलनचक्राचे प्रतीक आहे. सृष्टीच्या लयाचेही प्रतीक आहे. भगवान शंकर ध्यानमग्न असतात त्या वेळी त्यांच्या मनात काय, कशाचे, कोणाचे विचार ते करत असतात हे लपविण्यासाठी तर हा जटाभार धारण केला नाही ना असेही वाटते. या जटांमध्ये विलक्षण शिवशक्ती आहे. जटेचा एक केस उपटून जमिनीवर आपटला व त्यातून दक्षनाश करणारा वीरभद्र निर्माण केला ही पौराणिक कथा येथे आठवते. विलक्षण अहंकार, वेग, तीव्रता या जटाभारात ते बांधून टाकतात आणि पृथ्वीचे व लोकांचे कल्याण करतात. हे एक प्रकारचे शिवसामर्थ्यकवच आहे. ही शिवशक्ती आहे. शिवसामर्थ्यभांडार आहे. तांडवनृत्यात ते मुक्त होते व अन्य वेळी संचयित रूपात ते बांधलेले असते. यावर अन्य काही माहिती असल्यास वाचकांनी मला कळवावी म्हणजे माझ्या ज्ञानात भर पडेल असे मला वाटते.

६) तृतीय नेत्र :- त्र्यंबकेश्वर (महाराष्ट्र) येथील ज्योतिर्लिंग उत्पत्तीसंबंधी असे म्हणतात की या क्षेत्रास त्र्यंबकेश्वर म्हणण्याचे कारण येथे त्रिनेत्रधारी शंकर भगवान विराजमान आहेत म्हणजे त्र्यंबक (तीन नेत्र) धारी ईश्वर येथे आहेत. शंकरांचा तृतीय वा तिसरा डोळा याचे रहस्य काय? प्रतीकार्थ काय? यासंबंधी काही विचारधारा येणेप्रमाणे आहेत :-

अ) योगसाधनेच्या संदर्भाने याचा प्रतीकार्थ असा सांगतात की कुंडलिनी शक्ती जेव्हा षट्चक्र भेदते तेव्हा आत्म्याचा तिसरा नेत्र मलशून्य होतो आणि तो नेत्र स्वच्छ व प्रसन्न होतो.

ब) शंकरांचा तिसरा नेत्र दाखवितो की ते केवळ दोन नेत्रांचे अधिपती नाहीत म्हणजे केवळ इडा व पिंगला नाड्यांचेच स्वामी नाहीत. ते अजपा-जपाचे साधक आहेत. यामध्ये म्हणजे या अवस्थेत सूक्ष्मरूपातील प्राण डाव्या बाजूस स्थित इडा व उजव्या बाजूस स्थित पिंगला यांच्या स्थानात मध्यभागी स्थित सुषुम्ना नाडीच्या वरखाली संचार करू लागतो. कधीकधी स्थिर होऊ लागतो. समाधी लागू लागते. आत्मापरमात्म्याचे एकत्व स्थापित होते. ही समरसता व समरसीकरण आहे, हाच स्वभाव आहे, समरसभाव आहे, अद्वैतावस्था आहे, चिदानंदमय अद्वैतनिष्ठा आहे आणि द्वैत तसेच अद्वैत यांचे अंतिम परमतत्त्व आहे.

(उर्वरीत भाग पुढील अंकात....)

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

●●●

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

कुतूहल पाश्चात्त्य जगतामध्ये वाढले. एरवी साधू किंवा विचारवंतांपर्यंत सीमित असलेला योग हा विषय नवशिक्षित, विशेषतः विज्ञानवाद्यांना आकर्षणाचा वाटू लागला. मॅक्स प्लँक (Maks Plank) आणि अल्बर्ट आइन्स्टाइन (Albert Einsten) यांच्या पुंज आणि सापेक्षतावादांनी विज्ञानातच नाही तर तत्त्वज्ञानातही एक प्रचंड क्रांती घडवली. ग्रीक तत्त्वज्ञानाव्यतिरिक्त हिंदू, बौद्ध, जैन तत्त्वज्ञानांकडेही त्यांचे लक्ष वेधले गेले. एवढेच नाही तर विज्ञानाच्या नवीन सिद्धान्तांचे उपनिषदांमधील अनेक विचारांशी त्यांना साधर्म्य दिसू लागले. नील्स बोहर (Niels Bohr), श्रोडिंगर (Schrodinger) इ. अव्वल दर्जाच्या वैज्ञानिकांनी या संदर्भात व्यक्त केलेले विचार हे मुळातच वाचायला हवेत. शुद्ध तत्त्वज्ञानाच्या काही गोष्टी आपण बाजूला ठेवल्या; तरी योगामुळे प्राप्त होणाऱ्या अनेक सिद्धी, वैज्ञानिक कसोट्यांवर तपासण्याची सुरुवात यामुळेच झाली.

१९६० च्या दशकानंतर अमेरिकेत आणखी एक क्रांती होत होती. प्रचंड आर्थिक आणि भौतिक सुखांमध्ये डुंबल्यावरही अमेरिकेतील नवीन पिढीला खऱ्या सुखाची प्राप्ती होत नव्हती. यातूनच 'हिप्पी' आणि तत्सम अनेक संप्रदाय जन्माला आले. भोगापासून ते योगापर्यंतचे अनेक पर्याय त्यांनी शोधायला सुरुवात केली. मारक औषद्यांच्या सेवनातून स्वप्नांच्या दुनियेत ते तरंगायला लागले. पण औषधांचा अंमल उतरल्यावर स्वप्नातून त्यांना वास्तवातच यावे लागत होते. योगसाधनेच्या संदर्भात यामुळेच ज्या वेळी जास्त चिकित्सा व्हायला लागली, तेव्हा साहजिकच त्याच्या सर्व अंगांचा वस्तुनिष्ठ अभ्यास व्हायला लागला. योगसाधनेतून ज्या सिद्धी प्राप्त होतात तो एखादा 'चमत्कार' किंवा 'थोतांड' नसून ते वास्तव असल्याचे हळूहळू सिद्ध होऊ लागले. १९६२ मध्ये जो कामिया (Joe Kamiya) या जैवमानसशास्त्रज्ञाने अत्याधुनिक उपकरणांच्या साहाय्याने प्रथमच योगसिद्धींच्या वास्तवाबद्दल वैज्ञानिक अहवाल प्रसिद्ध केला. विज्ञानाला अशक्य वाटणाऱ्या, म्हणजे हृदयाचे स्पंदन किंवा श्वसनक्रियेचा वेग कमी-जास्त करणे, योगामुळे शक्य असल्याचे यातून सिद्ध झाले. रूढ (Classical) शरीरक्रियाशास्त्र आणि मस्तिष्कविज्ञानाच्या (Physiology आणि Brain Science) समजुतींमध्ये यामुळे मोठी क्रांती घडून यायला लागली. माणसाच्या शरीराच्या अनेक क्रिया या स्वैच्छिक (Voluntary) असतात. म्हणजे हातपाय हलवणे, पापण्यांची हालचाल इ. क्रिया या आपल्या इच्छेच्या अधीन असतात. तर मेंदूच्या क्रिया, हृदय, यकृत, आतडी इ. ची स्पंदने या अनैच्छिक (Involuntary) आहेत. या क्रिया चालवणारी व्यवस्था ही स्वयंचलित असून ती आपल्या इच्छेच्या अधीन नाही. शरीराची स्वैच्छिक कार्ये आपण जाणीवपूर्वक करत असतो तर अनैच्छिक कार्ये आपल्याला न समजता होत असतात. डॉ. एल्मर ग्रीन (Elmer Green) या संशोधकांनी स्वामी राम या योग्यावर या संदर्भातले अनेक प्रयोग केले. योगसाधनेने अनेक अनैच्छिक (Involuntary) शारीरिक क्रिया या ऐच्छिक असल्यासारख्या करता येतात हे यामुळे साधार सिद्ध झाले. यात सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे योगसाधनेमुळे सामान्यातल्या सामान्य माणसालाही या गोष्टी प्राप्त करून घेता येतात हेही सिद्ध झाले. ही एक मोठी क्रांतीच होती. आज या विषयावर अभ्यासकांकरता प्रचंड साहित्य उपलबध आहे. हा सर्व प्रकार योगाचाच एक भाग असलेल्या हठयोगाशी संबंधित आहे. पण योग म्हणजे फक्त हठयोग नाही.

योग हा शब्द ''युज्'' म्हणजे जोडणे या अर्थाने आहे. प्राथमिक स्तरावर मन आणि शरीर यांचे ऐक्य आधी साधले जाते. हठयोगामुळे मनाने शरीरावर मिळणाऱ्या प्रभुत्वापुरतेच पतंजलीचे योगशास्त्र मर्यादित नाही. यापुढे जाऊन शरीर, मन, निसर्ग आणि एकंदर परिसर यांच्यामधे एकत्व आणणे हेच योगाचे अंतिम उद्दिष्ट आहे. वास्तवामध्ये ते तसे असतेच, पण मनुष्य अज्ञानामुळे ते स्वतंत्र असल्याचे समजतो. योगशास्त्राच्या अभ्यासामुळे हे अज्ञान दूर होते आणि मन, शरीर नि परिसर यांचे परस्परावलंबित्व आपल्याला समजते. अनियंत्रित मानवी लालसेने निसर्गाच्या केलेल्या हानीमुळे बिघडलेले पर्यावरणाचे संतुलन हे याचे जिवंत उदाहरण आहे. योगशास्त्रामुळे या विश्वाच्या एकतेची जी प्रत्यक्ष जाणीव होते ती 'जाणीव' म्हणजेच 'कैवल्या'ची स्थिती. योगाचे अंतिम ध्येय हे हठयोगामुळे प्राप्त होणाऱ्या सिद्धी नसून, 'समाधी' किंवा 'कैवल्य' ही त्याची अंतिम पायरी आहे. एवढेच नाही तर अशा सिद्धी या अंतिम ध्येयामध्ये अडथळे निर्माण करू शकतात अशी धोक्याची सूचनाही स्वतः पतंजलीने देऊन ठेवली आहे.

समाज हा अनेक व्यक्तींचा बनलेला असतो. समाजातल्या सर्व घटकांच्या क्षमताही वेगवेगळ्या असतात. समाजाच्या नैसर्गिक गरजा सुरक्षित आणि संतुलितपणे पार पाडाव्यात म्हणून अनेक सामाजिक संस्थांची निर्मिती करण्यात येते. नाती-गोती, लग्न, वर्ण, आश्रम इ. अनेक संस्थांची निर्मिती हा त्याचाच एक भाग आहे. याशिवाय मानवी व्यवहारातूनही अनेक संस्था निर्माण होत असतात. ही सगळी जीवनपद्धती सुरळीत, कमीत कमी संघर्षमय आणि जास्तीत जास्त हितदायी व्हावी म्हणून अनेक नियमांचेही जाळे विणण्यात येते. यातूनच व्यक्तिगत आणि सामाजिक नीतिशास्त्राचा जन्म होतो. हिंदूपुरताच विचार करायचा तर या व्यापक परस्परावलंबी जीवनाला मार्गदर्शन करणारी 'यंत्रणा' म्हणजेच 'धर्म'. आपली दर्शने, योग, आयुर्वेदच काय; पण महाभारत, रामायणासारखे आपले इतिहासग्रंथही, व्यक्ती आणि समाजाला 'अधर्मा' पासून निवृत्त करून सदाचारी जीवन जगण्याचाच कायम आग्रह धरतात. भर्तृहरीची नीतिशतके असोत, रामदासांचे मनाचे श्लोक असोत किंवा दासबोध असो, तुकारामांचे अभंग असोत, एकनाथांची भारुडे असोत, किंवा मोरोपंतांच्या आर्या असोत; सगळ्यांचा हेतू एकच आहे, तो म्हणजे माणसाला नीतिमूल्यांचा आदर करायला शिकवणे. राग, लोभ, मत्सरापासून, मनाचा चंचलपणा हा नेहमीच 'सद्धर्माच्या'मध्ये येणारा एक मोठा अडथळा असतो. हा अडथळा दूर करण्याचा सर्वांत सोपा आणि साधा उपाय म्हणजेच आसनापलीकडील पतंजलीने सांगितलेले 'योगदर्शन'. सामान्य माणसाप्रमाणेच सामाजिक आणि राजकीय नेतृत्वालाही याची तेवढीच गरज असते. राजकारण्यांनी आणि स्वयंघोषित स्वामी नि गुरूंनी केलेली नीतिमूल्यांची आजची बोळवण बघता, यांना योगप्रचारापासून दूर ठेवणे हीच खरी योगसेवा ठरणार आहे. भविष्यातील योगदिवस तरी, या 'राज' योगापासून मुक्त असतील एवढीच आशा आपण बाळगू शकतो.

●●●

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१